पाचव्या वर्धापन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

सर्वांना... हार्दिक शुभेच्छा! गुढी पाडवा

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१ | गुरूवार दि.१९ मार्च २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–८ | किंमत ३ रूपये

## विशेष संपादकिय...

### घेतला वसा टाकणार नाही !

प्रिय वाचक हो आणि शेतकरी मायबाप हो,

पाच वर्षांपूर्वी आम्ही दैनिक राज्य लोकतंत्रची मुहूर्तमेढ बीड जिल्ह्यापासून रोवली. आज याला पाच वर्षे पूर्ण होत आहेत. याचवेळी आपले दैनिक शेतकऱ्यांसाठी वाहिलेले दैनिक असेल असा वसा आम्ही घेतला आहे. बीड जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण मराठवाड्यामध्ये दुष्काळी परिस्थिती आहे. रोजगाराचा अभाव, सिंचनाच्या असुविधा, उद्योग धंद्यांचा अभाव, अशा अनेक समस्यांना तोंड देत मराठवाड्यातील शेतकरी, कष्टकरी पुढे जाण्याचा प्रयत्न करीत आहे. यातही बीड जिल्हा हा ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून या जिल्ह्याची ओळख आहे. ही ओळख पुसली जावी यासाठी आमचा खारीचा का वाटा असेल तो आम्ही देऊन मराठवाड्यातील शेतकरी समृद्ध कसा होईल यासाठी गेली पाच वर्षे सतत प्रयत्न करत आहोत. शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान, शेतीमधील विविध प्रयोग, शेतीतील सकारात्मकता, शेतकऱ्यांना हिम्मत देण्याचे काम आम्ही सातत्याने करत आहोत. शेवटी शेतकरी टिकला तर समाज टिकेल. त्यासाठी शेतकरी समृद्ध झाला पाहिजे आणि शेतकरी समृद्ध होण्यासाठी शासनाच्या विविध योजना शेतकऱ्यापर्यंत कशा पोहोचतील आणि त्याचा फायदा शेतकऱ्यांना कसा होईल यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत.

मराठवाड्यामध्ये महिला शेतकरीही तेवढ्याच ताकतीने ◀◀ पान २ वर



# गारपीट अवकाळीचा पिकांना तडाखा

## विदर्भ, मराठवाड्यात पिकांचे नुकसान; बळीराजा संकटात

पुणे । प्रतिनिधी

राज्यात विविध भागांत अवकाळी पाऊस आणि गारपिट झाली. यात विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. निसर्गाच्या या लहरीपणाचा शेतकऱ्यांना फटका बसला असून, हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी वर्ग संकटात सापडला आहे. यावर शेतकरी वर्गाकडून तात्काळ पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी होत आहे.

मराठवाड्यातील हिंगोली वादळी वाऱ्यासह झालेल्या गारपिटीमुळे हळद, आंबा आणि ◀◀ पान २ वर












## थोडक्यात



### शंकरभारती महास्वामी महाराजांचे बीडमध्ये भव्य स्वागत

बीड। प्रतिनिधी

रामोत्सवानिमित्त म्हैसूर येथील श्री योगानंदेश्वर सवरस्वती मठाचे पीठाधीश्वर श्री श्री शंकर भारती महास्वामी महाराजांचे बुधवारी (दि.१८) बीड शहरात आगमन झाले असून त्यांच्या स्वागतासाठी शहरात भक्तीमय व उत्साहपूर्ण वातावरण पाहायला मिळाले. सायंकाळी बलभीम चौक, धोंडीपुरा येथून महाराजांची भव्य शोभायात्रा काढण्यात आली.

या शोभायात्रेत सजवलेले रथ, घोडे, टाळकरी, विणेकरी तसेच भजनी मंडळांचा उत्स्फूर्त सहभाग होता. विशेष आकर्षण ठरले ते रामाची वेशभूषा केलेल्या बालकांचे. याशिवाय शहरातील महिला व रामभक्त मोठ्या संख्येने सहभागी झाल्याने मिरवणुकीला भव्य स्वरूप प्राप्त झाले.बलभीम चौकातून निघालेली ही शोभायात्रा माळीवेस, सावता माळी चौक मार्गे रविराज मंगल कार्यालयापर्यंत काढण्यात आली. मार्गभर भक्तांनी स्वामीजींचे दर्शन घेत जयघोष केला.महाराजांचे बीडमध्ये पुढील दहा दिवस वास्तव्य राहणार असून या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. रामोत्सव समितीच्या वतीने भाविकांना या सर्व कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### सखाराम मस्के पाटील यांचे निधन


बीड। प्रतिनिधी



वैधकिन्ही येथील ज्येष्ठ शेतकरी व कष्टाळू व्यक्तिमत्त्व सखाराम मस्के पाटील (वय ५५)यांचे दिनांक १७ मार्च रोजी सायंकाळी सहा वाजता दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात शोककळा पसरली आहे.सखाराम मस्के पाटील यांनी आयुष्यभर शेती व्यवसाय व समाज सेवा करत कुटुंबाचा सांभाळ केला. मेहनत, प्रामाणिकपणा आणि साधेपणा ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख होती. त्यांनी अनेक अडचणींना सामोरे जात कष्टाच्या जोरावर आपले जीवन उभारले. गावातील प्रत्येकाशी जिव्हाळ्याचे संबंध ठेवत त्यांनी आपुलकीने वागणूक दिली. त्यांचा अंत्यविधी त्याच दिवशी सायंकाळी ९ वाजून ३० मिनिटांनी शोकाकुल वातावरणात पार पडला. त्यांच्या निधनाने कुटुंबावर तसेच गावावर मोठी पोकळी निर्माण झाली आहे.यावेळी जिल्हा परिषद माजी सदस्य ॲड. प्रकाश दादा कवठेकर तसेच पंचायत समिती माजी सभापती केशव रसाळ यांनी अंत्यदर्शनास उपस्थित राहून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. तसेच अशोक वाघमारे, गावचे सरपंच अतुल मकाळ , अभिजीत तांदळे, सखाराम पाटील, राहुल शिंदे, दत्ता घरत , भारत आरसूळ आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या पश्चात कुटुंबीय, नातेवाईक असा मोठा परिवार आहे.

### रुद्रप्रतापसिंह तौर नवोदय विद्यालय प्रवेशासाठी पात्र

माजलगाव। प्रतिनिधी



तालुक्यातील राजेगाव येथील सरस्वती विद्यालयाचा विद्यार्थी रुद्रप्रतापसिंह योगेश तौर याने ६४ वा रँक मिळवून नवोदय विद्यालय पात्रता परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. तो नवोदय विद्यालय गढी येथे प्रवेशासाठी पात्र ठरला आहे. ग्रामीण भागात शिक्षण घेऊन रुद्रप्रतापसिंह याने विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवले आहे.तो सैनिकी स्कूल प्रवेशासाठीसाठी देखील पात्र ठरला आहे.या विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार राधाकृष्ण पाटील, सतीश दुगड,सचिव माजी नगराध्यक्ष अशोक होके पाटील, दयानंद तोष्णीवाल, विलासराव लांडगे , संतोष कोथाळकर, प्रभाकराव कचरे, डॉ.योगिता होके पाटील,अभय होके पाटील,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष बाळासाहेब कचरे,उपाध्यक्ष विजय साळवे, शिक्षणप्रेमी नागरिक डॉ.जनक चौरे,मुख्याध्यापक अशोक कचरे यांच्यासह सर्व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

### जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी रुपचंद कांबळे

माजलगाव। प्रतिनिधी



जयभीम नगर, माजलगाव येथे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने साजरी करण्यासाठी २०२६ सालची उत्सव समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या अध्यक्षपदी रुपचंद नाना कांबळे यांची निवड करण्यात आली आहे.समितीच्या इतर पदाधिकाऱ्यांमध्ये उपाध्यक्षपदी बबन शेळके, कोषाध्यक्षपदी चंद्रमणी डोंगरे (सर), सचिवपदी राहुल कांबळे तर देखावा प्रमुख म्हणून विनय पोटभरे यांची निवड करण्यात आली आहे.

याशिवाय सल्लागार मंडळात चंद्रकांत नाना टाकणखार, अविनाश दादा बनसोडे, अशोक मगर, सुभाष बनसोडे, आकाश जोगदंड, दीपक कसबे, जितेंद्र पोटभरे, मधुकर साळवे, किसन भदर्गे, परमेश्वर हजारे, अशोक डोंगरे, अतुल भदर्गे, बिभीषण सोनवणे, नारायण मगर, सचिन साळवे, दयानंद मगर, स्वप्नील पोळ, रविकिरण टाकणखार, दयानंद सावंत, साजन जाधव, संतोष आठवले, अभिजित साळवे, विशाल टाकणखार, सचिन वैद्य, आकाश टाकणखार, शिवदास टाकणखार, भिकाजी कांबळे, सचिन जाधव, शेषेराव उजगरे, मिलिंद कांबळे, बदाम आठवले, उद्धव मस्के, विष्णू साळवे, शिवाजी खरात, तात्याराव वाघमारे, पवन सावंत, बन्सी सिरसाठ यांचा समावेश आहे.या उत्सव समितीच्या माध्यमातून यंदाची जयंती विविध सामाजिक, सांस्कृतिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांनी साजरी करण्याचा संकल्प करण्यात आला असून परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# भिवंडीच्या अल्पवयीन मुलीचा पाटोद्यात वृद्धाशी जबरदस्तीने विवाह

## महाराज निघाला मास्टरमाइंड

पाटोदा । प्रतिनिधी

माणुसकीला काळीमा फासणारी एक संतापजनक घटना बीड जिल्हयातील पाटोदा तालुक्यात उघडकीस आली आहे. भिवंडीतील एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून तिचे पाटोदा तालुक्यातील एका वृद्ध व्यक्तीशी जबरदस्तीने लग्न लावून देण्यात आले. या संपूर्ण प्रकरणाचा मास्टरमाइंड गोवर्धन महाराज असल्याचे समोर आले असून, पोलिसांनी पतीसह चार मुख्य संशयितांविरुद्ध गंभीर गुन्हे दाखल केले आहेत.

नेमकी घटना काय? मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी भिवंडीत आपल्या नातेवाईकांकडे राहत होती. तिची हलाखीची परिस्थिती ओळखून विलास हिलम नावाच्या आरोपीने तिला ''तुझ्यासाठी चांगला मुलगा पाहिला आहे,'' असे सांगून तिचा विश्वास संपादन केला. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी तिला फसवून बीड जिल्ह्यात आणण्यात आले. पाटोदा तालुक्यातील एका वृद्ध व्यक्तीशी तिचे लग्न ठरवण्यात आले होते.

व्यक्तीचे वय खूप जास्त असल्याने पीडितेने या लग्नाला ठाम नकार दिला. मात्र, आरोपींनी तिला ''तुला सांभाळणारे कोणी नाही'' असे धमकावून २७ फेब्रुवारी रोजी जबरदस्तीने तिचा बालविवाह लावून दिला. नराधमांचा अड्डा: गोवर्धन महाराजचे घर : पीडित मुलीच्या तक्रारीनुसार, हे संपूर्ण रॅकेट अत्यंत सुनियोजित पद्धतीने चालवले जात होते. सुरुवातीला मुलीला पाटोदा तालुक्यातील चिंचपूर येथील गोवर्धन महाराज याच्या घरी डांबून ठेवण्यात आले होते. तिथेच तिचा विवाह लावून दिल्यानंतर तिला उंबरविहीर येथील एका निर्जन शेतातील घरात नेण्यात आले. तिथे तिच्यावर वारंवार अत्याचार करण्यात आले. अशी झाली सुटका : पीडितेकडे मोबाईल नसल्याने तिला कोणाशीही संपर्क साधता येत नव्हता. १० मार्च रोजी तिचे काही ओळखीचे लोक तिथे पोहोचले असता, तिने आपली आपबिती त्यांना सांगितली. आरोपींनी तिला सोडण्यास नकार दिला होता, मात्र एका व्यक्तीला जामीन म्हणून ओलीस ठेवण्याच्या अटीवर तिला सोडण्यात आले. तिथून सुटका होताच तिने पोलिसांत धाव घेतली. पोलिस कारवाई : या प्रकरणी पीडितेचा पती, गोवर्धन महाराज, अंबादास मोरे आणि विलास हिलम यांच्यासह लग्नाला उपस्थित असलेल्या नातेवाईकांवर खालील कलमान्वये गुन्हे दाखल झाले आहेत

# महिलांच्या बचत गटांना अवजार बँकांसाठी २४ लाखांपर्यंत अनुदान

### प्रत्येक गावातील फक्त एकाच गटाला लाभ

बीड। प्रतिनिधी

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या (पोक्रा) दुसऱ्या टप्प्याअंतर्गत, बीड जिल्ह्यातील महिला बचत गटांना कृषी व्यवसायात प्रगती साधण्यासाठी आर्थिक सहाय्य दिले जाईल. या योजनेअंतर्गत, ग्राम पातळीवर कृषी अवजार बँक स्थापन करण्यासाठी प्रकल्पाच्या मूल्याच्या ६० टक्क्यांपर्यंत आणि कमाल २४ लाख रुपयांपर्यंतचे अनुदान दिले जाईल. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आणि प्रकल्प संचालक- आत्मा, सुभाष साळवे यांनी यासाठी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

प्रकल्प गावांमधील उमेद, माविम व आत्मा पुरस्कृत आणि इतर महिला बचत गट तसेच महिलांच्या ग्राम संघटना या उपक्रमासाठी पात्र असतील. लाभ मिळवण्यासाठी, संबंधित गटामध्ये वेगवेगळ्या कुटुंबांतील किमान १० सदस्य असणे आवश्यक आहे. तसेच, ज्या गटांनी यापूर्वी इतर कोणत्याही सरकारी योजनेअंतर्गत कृषी अवजार बँकेचा लाभ घेतला आहे, त्यांना या योजनेत सहभागी होण्याची परवानगी दिली जाणार नाही. प्रत्येक गावातील केवळ एकाच महिला गटाला या योजनेचा लाभ दिला जाईल. एका गावातून एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास, लाभार्थ्यांची निवड सोडत पद्धतीने केली जाईल. जर प्रकल्पाचे मूल्य २० लाख रुपयांपेक्षा जास्त असेल तर राष्ट्रीयीकृत बँकेकडून ७५ टक्के कर्ज घेणे बंधनकारक असेल. निवडक गटांना ट्रॅक्टर आणि ट्रॅक्टर-चलित अवजारे, बीबीएफ यंत्रे, लागवड आणि पेरणी यंत्रे, मल्चिंग यंत्रे, कंबाईन हार्वेस्टर आणि फवारणी पंप यांसारखी आधुनिक कृषी यंत्रसामग्री खरेदी करता येईल. इच्छुक महिला बचत गटांनी ५ एप्रिलपर्यंत प्रकल्पाच्या अधिकृत पोर्टलवर ऑनलाइन नोंदणी करून अर्ज सादर करावेत.अधिक माहितीसाठी, प्रकल्प गावातील समूह सहाय्यक आणि स्थानिक कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रकल्प संचालक आत्मा सुभाष साळवे यांनी केले आहे.

### राम जन्मोत्सवानिमित्त सौताडा येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

पाटोदा । प्रतिनिधी

श्री राम जन्मोत्सवानिमित्त सौताडा येथे भव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. या सप्ताहाची सुरुवात गुरुवार, दि. १९ मार्च २०२६ रोजी झाली असून समारोप शुक्रवार, दि. २७ मार्च २०२६ रोजी होणार आहे. सप्ताहादरम्यान दररोज विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमांतर्गत दररोज काकडा हरिपाठ, ज्ञानेश्वरी पारायण, कीर्तन व हरिजगार यांचा समावेश आहे. राज्यभरातील नामवंत कीर्तनकार व यांची उपस्थिती लाभणार असून त्यांच्या परमपूज्य पांडुरंग प्रभाकर देशमुख शास्त्री व ह भ प महबूब महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनातून भाविकांना अध्यात्मिक ज्ञानाचा लाभ मिळणार आहे. या सप्ताहात ह.भ.प. रविदास वांदळे महाराज आदे , ह.भ.प. बाजीराव महाराज बामदाळे , ह.भ.प. कृष्णा महाराज काकडे, ह.भ.प. चैतन्य महाराज शास्त्री, ह.भ.प. प्रकाश महाराज बोथले, ह.भ.प. वैजनाथ महाराज जाधव, ह.भ.प. साध्वी सोनाली दीदी करपे ह भ प रामकृष्ण रणदिवे बापू यांचे राम जन्म निमित्त विशेष असे किर्तन होणार आहे अनेक मान्यवर कीर्तनकारांची उपस्थिती राहणार आहे.

# इराण-अमेरिका संघर्षाच्या नावाखाली पाटोद्यात व्यापाऱ्यांची लूट

## भाववाढीने सामान्य जनता मेटाकुटीला!

पाटोदा। प्रतिनिधी

जागतिक स्तरावर इराण आणि अमेरिका यांच्यातील तणाव वाढत असताना, त्याचे पडसाद आता स्थानिक बाजारपेठांमध्ये उमटू लागले आहेत. मात्र, हे पडसाद नैसर्गिक नसून व्यापाऱ्यांनी स्वतःहून लादलेले असल्याचे चित्र बीड जिल्ह्यातील पाटोदा शहरात पाहायला मिळत आहे. युद्धाच्या नावाखाली पाटोद्यातील व्यापाऱ्यांनी जीवनावश्यक वस्तूंची कृत्रिम टंचाई निर्माण करून अव्वाच्या सव्वा भाववाढ सुरू केली असून, याद्वारे सामान्य जनतेची उघडपणे लूट केली जात आहे.

जुनाच माल चढ्या भावाने विक्री धक्कादायक बाब म्हणजे, व्यापाऱ्यांकडे असलेला जुना साठा (स्टॉक) ज्याची खरेदी जुन्याच दराने झालेली आहे, तो माल आता युद्धामुळे भाव वाढले आहेत असे सांगून चढ्या दराने विकला जात आहे. खाद्यतेल, डाळी आणि इतर किराणा मालाच्या किमतीत रातोरात वाढ करण्यात आली आहे. ''युद्ध दुसऱ्या देशात सुरू आहे, मग त्याचे चटके पाटोद्यातील गरिबांच्या खिशाला का?'' असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. प्रशासनाचे दुर्लक्ष, कारवाईची मागणी स्थानिक नागरिकांच्या मते, ही केवळ नफेखोरी असून व्यापाऱ्यांनी संगनमत करून ही दरवाढ लादली आहे. आपल्याच देशातील बांधवांना अशा संकटाच्या नावाखाली लुटणे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या जनतेने आता जिल्हा प्रशासनाकडे धाव घेतली आहे.नागरिकांची मुख्य मागणी: १. जिल्हा पुरवठा विभागाने तात्काळ पाटोदा बाजारपेठेतील दुकानांची तपासणी करावी. २. साठेबाजी करणाऱ्या आणि चढ्या दराने माल विकणाऱ्या व्यापाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई व्हावी. ३. जीवनावश्यक वस्तूंचे दर फलक दुकानाबाहेर लावणे बंधनकारक करावे. जर प्रशासनाने वेळीच लक्ष दिले नाही, तर ही लूट अशीच सुरू राहील आणि सर्वसामान्यांचे जगणे कठीण होईल. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी याप्रकरणी वैयक्तिक लक्ष देऊन पाटोद्यातील कृत्रिम भाववाढीला लगाम घालावा, अशी मागणी जोर धरत आहे.

### माजलगावची सुहृदा कुलकर्णी जिल्ह्यात अव्वल

माजलगाव। प्रतिनिधी



नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत माजलगाव येथील कु. सुहृदा सारंग कुलकर्णी हिने ९८.७५ टक्के गुण मिळवत बीड जिल्ह्यात अव्वल स्थान पटकावले आहे. तिच्या या उल्लेखनीय यशामुळे सर्वत्र कौतुक होत आहे. नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा ही गुणवत्ता तपासणारी अत्यंत कठीण व महत्त्वाची परीक्षा मानली जाते. या परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी करत सुहृदाने आपली बुद्धिमत्ता व मेहनत सिद्ध केली आहे. ती माजलगाव येथील प्रसिद्ध डॉक्टर सारंग कुलकर्णी यांची कन्या आहे.

सुहृदाच्या यशामागे तिच्या आई-वडिलांचे तसेच शिक्षकांचे मोलाचे सहकार्य लाभले. याशिवाय मनीषा जाधव व डॉ. आर्यन जाधव यांचे तिला विशेष मार्गदर्शन मिळाले. तिच्या या यशाबद्दल डॉ. आर्यन जाधव व प्रा.डॉ. सुदर्शन स्वामी यांच्या हस्ते सुहृदाचा सत्कार करण्यात आला. तिच्या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळत असून, भविष्यातही ती यशाची परंपरा कायम ठेवेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. सुहृदाच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# वडवणी वैकुंठधाम याठिकाणी अस्थी ठेवण्यासाठीच्या लॉकरचे लोकार्पण

## रामलिंग पतसंस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त अभिनव उपक्रम

वडवणी। प्रतिनिधी



मानवी जिवनातील शेवटच्या टप्प्यावर देखील सन्मान आणि सुव्यवस्था मिळावी, या उदात्त भावनेतून वडवणीच्या रामलिंग पतसंस्थेने आपल्या वर्धापन दिनानिमित्त येथील वैकुंठधाम (अमरधाम) याठिकाणी अस्थी ठेवण्यासाठीचे लॉकर भेट देवून सुविधेसाठी उपलब्ध करण्याचा हा अतिशय स्तुत्य व अभिनव असा सामाजिक उपक्रम राबवला आहे. अशा प्रकारच्या सुविधेमुळे मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांना व नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, समाजहिताच्या दृष्टीने हे कार्य अत्यंत कौतुकास्पद आहे असे प्रतिपादन नगराध्यक्ष शेषेराव बाप्पु जगताप यांनी लोकार्पणाप्रसंगी व्यक्त केले.

वडवणी येथील रामलिंग नागरी सहकारी पतसंस्था म.ता.वडवणी या पतसंस्थेने बीड जिल्ह्याच्या नव्हे तर मराठवाड्याच्या सहकार क्षेत्रात आपल्या पारदर्शक, तत्पर व विनम्र सेवेतून हजारो ग्राहकांचा विश्वास संपादन करीत सहकाराचे मोठे जाळे विणले आहे. आजवर अनेक अभिनव व सामाजिक उपक्रमांतून पतसंस्थेने आपली वेगळेपणाची चुणूक नेहमीच दाखवली आहे. यावर्षीही आपल्या पतसंस्थेच्या ३५ व्या वर्धापन दिनानिमित्त जनहिताचाच उपक्रम राबविण्याचा निर्णय सर्वश्री संचालक मंडळ व सभासद बांधवांनी घेतला होता. त्यानूसार वडवणी शहरातील वैकुंठधाम (अमरधाम) याठिकाणी मृत व्यक्तीच्या अस्थी सावडण्याचा विधी झाल्यानंतर वैकुंठधाम याठिकाणीच एका छोट्या मातीच्या कलशामध्ये पांढरे कापड गुंडाळून काही प्रमाणात अस्थी व राख पुढील सात दिवसांसाठी ठेवावी लागते. कारण दहावा विधीसाठी त्या अस्थी व राख तेथून सोबत घेवून जावी लागते. मात्र त्याठिकाणी तो मातीचा कलश ठेवण्यासाठी सुरक्षित जागा व ठिकाण उपलब्ध नसल्याने नाईलाजाने नागरिकांना तो अस्थी कलश तेथील एखाद्या झाडाखाली फांदीला बांधून ठेवावा लागत असे. अनेकदा तर अस्थी कलशाची आदला-बदलीही झाल्याच्या घटना ऐकवयास आहेत. त्याठिकाणी नागरिकांची हीच होणारी हेळसांड लक्षात घेवून रामलिंग पतसंस्थेच्या संचालक मंडळ यांनी वैकुंठधाम याठिकाणी अस्थी कलश सुरक्षित ठेवण्यासाठी एक २४ कप्प्यांचे कुलूपबंद लोखंडी लॉकर कपाट भेट देण्याचा निर्णय घेतला. व त्यानुसार नेहमीप्रमाणे सामाजिक बांधिलकी जपणारा प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात आला. दि.१८ मार्च २०२६ बुधवार रोजी सकाळी या अस्थी ठेवण्यासाठीचे लॉकरचे लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी नगरपंचायतीचे नगराध्यक्ष शेषेराव बाप्पु जगताप, उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, सभापती नागेश डिगे, नगरसेवक संभाजीराव शिंदे, नगरसेवक श्रीकांत माळवदे, सुरेशराव दिवटे, रामेश्वर पाटोळे, रामलिंगचे व्हाईस चेअरमन अरुणराव गुरसाळी, व्यवस्थापक दिगांबर गुरसाळी, सर्वश्री संचालक सुरेशराव ढवळशंक, प्रकाशराव डिगे, उपमन्यूजी वारे, पत्रकार सुभाषराव वाव्हळ यांच्यासह कर्मचारी वृंद व नागरिक उपस्थित होते. संचालक व सभासद बांधवांनी या लॉकरच्या चाव्या नगराध्यक्ष यांच्याकडे सुपूर्द करत या अत्यंत उपयुक्त व संवेदनशील सुविधेचे लोकार्पण मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. दरम्यान यावेळी उपस्थितांनी वैकुंठधाम याठिकाणी अंत्ययात्रेसाठी आवश्यक असणारी तिरडी ही वस्तू देखील पतसंस्थेच्या वतीने देण्यात यावी अशी भावना वजा मागणी केली असता, याठिकाणी लागलीच स्टीलच्या दोन तिरडी पतसंस्थेच्या वतीने देण्यात येतील असे व्हाईस चेअरमन अरुणराव गुरसाळी यांनी सांगितले. तत्पूर्वी सकाळी या अगोदर रामलिंग पतसंस्थेच्या सभागृहात या वर्धापन दिनानिमित्त श्री.चौंडेश्वरी मातेच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले होते. याप्रसंगी अनेक संचालक, सभासद, ग्राहक व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

## पान १ वरून...


### गारपीट अवकाळीचा

कलिंगड पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. विशेषतः काढणीला आलेला आंबा जमिनीवर पडल्याने बागायतदारांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. तर लातूर जिल्ह्यातील चाकूर, औसा आणि निलंगा भागातही ७० एकरांवरील आंबा बागा उद्ध्वस्त झाल्या आहेत. मागील वर्षाचे नुकसान भरून निघण्याआधीच यंदाही अशीच परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकरी अडचणीत आला आहे. धाराशिव जिल्ह्यात झालेल्या गारपिटीमुळे द्राक्ष बागांचे प्रचंड नुकसान झाले आहे. यात लोहारा तालुक्यात अनेक बागा जमीनदोस्त झाल्या असून, द्राक्ष खरेदीसाठी व्यापारी पुढे येत नसल्याने साठवलेला माल सडू लागला आहे. तर, दुसरीकडे, सांगली जिल्ह्यात हळद उत्पादकांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतात वाळत घातलेली हळद पावसामुळे कुजायला लागली असून, ७० ते ८० टक्के पीक वाया गेल्याचे दिसून येत आहे. सोलापूरच्या अक्कलकोट तालुक्यात गारपिटीमुळे ज्वारी आणि गहू पिके आडवी झाली आहेत. ही पिके वर्षभराच्या अन्नाची सोय करणारी असल्याने ग्रामीण भागात चिंता वाढली आहे. तसेच, गडचिरोली जिल्ह्यातही मिरची पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. सोलापूरहैदराबाद महामार्गावर गारांचा थर साचल्याचे चित्र पाहायला मिळाले. दरम्यान, या गंभीर परिस्थितीवर कृषीमंत्र्यांनी प्रतिक्रिया दिली असून, पुढील ४८ तास २४ जिल्ह्यांसाठी महत्त्वाचे असल्याचे सांगितले त्यांनी सांगितले आहे. तसेच, बाधित शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार खंबीरपणे उभे असून, नुकसान भरपाईसाठी तातडीने पंचनामे करण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाला देण्यात आले आहेत. त्यामुळे एकही बाधित शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, असे त्यांनी सांगितले.

---

### घेतला वसा टाकणार नाही !

शेती करतात. त्यांचाही सन्मान झाला पाहिजे यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न केलेले आहेत. शेतकरी समृद्ध तर जग समृद्ध अशा तत्वावर आम्ही सातत्याने पाच वर्षापासून दैनिक राज्य लोकतंत्रच्या माध्यमातून आमचा खारीचा वाटा उचलत आहोत. बीड जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण मराठवाड्यात काही फारशी वेगळी स्थिती नाही. सुरुवातीपासूनच या भागामध्ये सिंचन क्षेत्राचा अभाव राहिला आहे. संभाजीनगर आणि नांदेडचा काही भाग सोडला तर मराठवाड्यात पाणी प्रश्न नेहमीच गंभीर असतो. लातूर जिल्ह्याला तर एकदा रेल्वेने पाणी आणण्याची वेळ आली होती. अशा परिस्थितीत नदीचे खोलीकरण, छोटे छोटे बंधारे, यांच्या माध्यमातून पाणी आणून मराठवाड्यातील शेतकरी समृद्ध करण्यासाठी ज्या ज्या संस्था आणि जे जे समाजसेवक काम करतात त्यांना बळ देण्याचे काम आम्ही सातत्याने केले आहे. बीड जिल्ह्यामध्ये परळी तालुक्यातील सिरसाळा या दुर्गम भागामध्ये दिल्लीतील एक माणूस येतो आणि इथल्या शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी प्रयत्न करतो त्या मयंक गांधींना वेळोवेळी प्रकाश झोतात आणण्याचे काम आम्ही केले आहे. त्यांनी शेती आणि सिंचनासाठी केलेले वेगवेगळे प्रयोग लोकांपर्यंत कसे पोहोचतील यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न केलेले आहेत. मराठवाड्यात अशा अनेक संस्था आहेत ज्या शेतकऱ्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करतात. त्यांना बळ देण्याचे काम आम्ही केले आहे. मराठवाड्यातील शेतकरी हा मेहनती आणि जिद्दी आहे. त्यामुळे या भागात सिंचन शेती शिवाय इतर पर्याय उभे राहतील काय यासाठी प्रयत्न होत आहेत. मराठवाड्यातील जमिनीवर फळबागा लागवड, हंगामी पिके घेऊन शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ कशी होईल यासाठी आम्ही अनेक यशोगाथा आमच्या दैनिकातून प्रकाशित केल्या जेणेकरून इतर शेतकऱ्यांनाही त्याची प्रेरणा मिळेल. आज बीड जिल्ह्यातही अनेक प्रयोग होत आहेत. मोसंबी, केशर आंबा, डाळिंब, सीताफळ, लिंबू या फळ पिकांसाठी मोठ्या प्रमाणात प्रयोग यशस्वी होत आहेत. आज बीड जिल्ह्याचा माल संपूर्ण महाराष्ट्रात अनेक ठिकाणी जात आहे. त्यासाठी शेतकरी स्वतः प्रयत्न करत आहेत. त्यांना बळ देण्याचे काम आम्ही सातत्याने केले आहे. शेवटी शेतकरी पुत्र म्हणून केवळ व्यासपीठावरून भाषणे न करता प्रत्यक्ष शेतकऱ्यांसाठी आपल्याला काय करता येईल, त्यांना आपली मदत कशी होईल, यासाठी सातत्याने प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यातही आम्ही आमचा खारीचा वाटा उचललेला आहे. सातत्याने शेतकऱ्यांचे प्रश्न चव्हाट्यावर मांडणे आणि प्रशासनाकडून त्याची उत्तरे शोधणे यासाठी आमचे काम चालू आहे. गेल्या पाच वर्षापासून आम्ही शेतकऱ्यांसाठी विशेष प्रयत्न करत आहोत. मराठवाड्यात आमचे एकमेव दैनिक असेल ज्या दैनिकांमध्ये पहिल्या पानावर शेतकऱ्यांचे प्रश्न आणि शेतकऱ्यांसाठी च्या बातम्या असतात. मराठवाड्यातील इतर कुठल्याही दैनिकात असा प्रयोग झालेला नाही. शेवटी व्यवसायापेक्षा शेतकरी समृद्ध होणे फार गरजेचे आहे. आणि ते काम आम्ही आमच्या परीने जेवढे शक्य होईल तेवढे करत आहोत. शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी शेतकरी बचत गट, महिला बचत गट, शेळीपालन, कुकुटपालन, रेशीम शेती यासाठी जे -जे शेतकरी पुत्र प्रामाणिकपणे प्रयत्न करत आहेत. जे -जे अधिकारी यासाठी बळ देत आहेत. त्यांना प्रकाश झोतातआणण्याचे काम आम्ही सातत्याने करत आहोत. बीड जिल्ह्यातील शेतकरी मेहनती आहे. त्याला बळ दिले त्याची हिंमत वाढवली तर तो काहीही करू शकतो. आम्हाला याचा ठाम विश्वास आहे. त्यामुळे त्याला बळ देण्याचे काम आम्ही सातत्याने केले आहे. मराठवाड्यामध्ये विशेषता बीड जिल्ह्यामध्ये शेतकरी आत्महत्या मोठ्या प्रमाणात होत आहेत. हा विषय महाराष्ट्रासाठी गंभीर आहे. या आत्महत्या थांबण्यासाठी सरकार तर प्रयत्न करीतच आहे. पण सामाजिक संस्था ही त्यासाठी पुढाकार घेत आहेत. या सामाजिक संस्थांना - शेतकऱ्यांना बळ देण्याचे काम आम्ही आपल्या परीने चालूच ठेवले आहे. शेवटी सर्व गोष्टी आर्थकारणावर अवलंबून आहेत. अर्थकारणावर समाजकारण अवलंबून आहे. मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात शेतकरी कुटुंब आहेत. विशेषता बीड जिल्ह्याची अर्थव्यवस्थाच शेतीवर अवलंबून आहे. शेतकरी कोलमडला तर जिल्ह्यातील अर्थव्यवस्थेचे गणित बिघडून जाते. हे अनेक वेळा अनुभवलेले आहे. त्यामुळे शेतकरी समृद्ध झाला तरच जिल्हा समृद्ध होईल अशी आमची धारणा आहे. शेतकरी उत्पादनाबरोबरच त्यांच्या पिकांना योग्य भाव मिळणे ही बाब पण महत्त्वाची आहे. त्यामुळे सातत्याने आम्ही शेतकऱ्यांना बाजारभावाची माहिती देत आहोत. शेवटी शेतकऱ्यांसाठी जे - जे काही करता येईल ते- ते करण्याचा आम्ही पहिल्या दिवसापासून जो वसा घेतला आहे. तो वसा कधी टाकणार नाही. ही शेतकऱ्यांसाठी आमच्याकडून ग्वाही आहे. शेतकऱ्यांच्या सुखदुःखासाठी त्यांना मदत करण्यासाठी आम्ही आमच्या परीने जेवढे करता येईल तेवढे अखंडपणे करत राहू.


उच्चत्तम कृषी उत्पन्न बाजार समिती,माजलगाव जि.बीड
जाहिर प्रगटन
भारत देशाला स्वर्ग बनवायचे असेल तर स्वच्छतेचा मुलमंत्र जपा
* शेतकऱ्यांना चांगला भाव,ग्राहकांना रास्त भाव ** व्यावहारासाठी सुविधांची उपलब्धता
* शेतकऱ्यांचा शेतमाल उघड पध्दतीने लिलाव व प्रमाणीत इलेक्ट्रॉनिक वजनमापाने बाजार समितीच्या देखरेखी खाली वजन माप कटऱ्यांना प्रतिबंध.
* बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात मार्केट यार्ड शिवाय इतर ठिकाणी आधिसुचित शेतीमाल खरेदी विक्रीचा व्यवसाय करण्यास प्रतिबंध.
* विक्री केलेल्या शेतीमालच्या रक्कमेचे त्वरीत वितरण. ** शेतीमाल चांगला वाळवा,शेतीमाल साफ करुण आणा.
* बाजार भाव आवकीचा कल पहा.** शेतीमाल खेड्यात व खळ्यात विकु नका तर बाजार समितीच्या फुलेपिंपळगांव आवारात विका.
* कापुस खरेदी केंद्रावरच विक्री करा.आठवडी बाजारात,जुना मोंढा आवारात कापूस विक्री न करता जिनिंगवर कापुस खरेदीचे अधिकृत परवाना धारकांना विक्री करा.
* बाजार भाव/कृषि पणन/उत्पादन/उत्पादनोत्तर तंत्रज्ञान विषयक शासकीय योजना बाबतची माहिती व इतर शेती उपयोगी माहिती मार्गदर्शनाचे कृषि पणन मित्र या मासीकाचे (वार्षीक वर्गणी दर रु २००/-) वर्गणीदार होणेसाठी बाजार समितीशी संपर्क साधावा.
* बाजार भावा संबधी वेब साईड -www.msamb.com आणि www.agmarknet.nic.in
* फुलेपिंपळगांव बाजार आवारात शेतीमाल विक्री साठी घेऊन येणाऱ्या शेतकऱ्याना रु.१/- मध्ये जेवणाची व्यवस्था
* कृषी उत्पन्न बाजार समिती,माजलगांव जि.बीडचे कार्यक्षेत्रात शेतकऱ्यांना शेतावर रहदारीसाठी बाजार समितीचे २५ % रक्कम सहभाग घेऊन शेतीपोहच रस्ते तयार करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे.
* फुलेपिंपळगांव मुख्य बाजार आवारात बाजार समिती मार्फेत ६० मेर्टीक टन शमतेचा इलेक्ट्रॉनिक भुई काट्याची सुविधा करण्यात आली आहे.
* मुख्य बाजार आवार फुलेपिंपळगांव शिवार CCTV कॅमेऱ्यांच्या निगराणी खाली.
* मुख्य बाजार आवार येथे सर्व बाजार घटकांनसाठी स्वतंत्र्य सुसज्ञ स्वच्छता ग्रहाची सोय.
राज्य लोकतंत्र
पाचव्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
** आपला परिसर स्वच्छ व सुंदर ठेवा हि आपली जबाबदारी आहे. स्वच्छता असे जिथे देवाचे वास्तव्य असे तेथे **
जयदत्त सुभाषराव नरवडे
सभापती
श्रीहरी दिंगांबरराव मोरे
उपसभापती
एच.एन.सवणे
सचिव
शुभेच्छुक : श्री डक अशोक गोविंदराव, श्री सोळंके विरेंद्र प्रकाशराव, श्री नाईकनवरे उध्दव विठ्ठलराव, श्री डाके दत्तात्रय जिजाबा,श्री जगताप मनोज बाळाभाऊ, श्री.कचरे संजय वचिष्ठ,सौ.घायतिडक सरस्वती आसाराम, सौ.भोसले अंजली अबाजी, श्री सजगने नंदकिशोर दत्तात्रयराव ,श्री जाधव अमोल अरुणराव, श्री नाईकनवरे नितीन किशनराव, श्री शेजुळ भागवत प्रकाशराव,श्री आगे भगवान लक्ष्मणराव, श्री होके प्रभाकर गणपतराव, श्री.नावंदर जुगलकिशोर मिठुलाल, श्री पठाण कदीर पठाण शेरखाँ


लोकनेते
मा.श्री.छगनरावजी भुजबळ साहेब
ओबीसी नेते
लोकनेत्या
मा.सुशिलाताई मोराळे
मा.ना.अतुलजी सावे
बहुजन कल्यान मंत्री महाराष्ट्र राज्य
मा.आ.योगशे (अण्णा) टिळेकर
दैनिक राज्य लोकतंत्र
वर्धापनदिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
प्रा.वैजनाथ शिंदे
ओबीसी नेते, बीड जिल्हा


राज्य लोकतंत्र
पाचव्या वर्धापन दिनानिमित्त
व गुढीपाडव्यानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
कृष्णा शिराळे
कृष्णा शिराळे


राज्य लोकतंत्र
शिवसेना
पाचव्या वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा...
* शुभेच्छुक *
संतोष किसनराव जाधव
शिवसेना तालुका प्रमुख, बीड


राज्य लोकतंत्र
पाचव्या वर्धापन दिनानिमित्त
व गुढीपाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा
* शुभेच्छुक *
जालिंदर सांगळे
कामगार तलाठी कोरडगाव पाथर्डी


शिव सेना
दैनिक राज्य
लोकतंत्र
५ व्या वर्धापन दिन
निमित्त व
गुडीपाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा...!
* शुभेच्छुक *
शिवसेना
उध्दव बाळासाहेब ठाकरे
गणेश वरेकर शिवसेना जिल्हाप्रमुख,बीड
(उद्धव बाळासाहेब ठाकरे)


राज्य लोकतंत्र
दैनिक राज्य
लोकतंत्र
वर्धापन
दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा..!
चंदु मिसाळ
सरपंच कोल्हेवाडी ग्रामपंचायत व
भाजपा सरचिटणीस केज तालुका


राज्य लोकतंत्र
पाचव्या वर्धापन दिनानिमित्त
व गुढीपाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा
* शुभेच्छुक *
नगराध्यक्ष
श्री.शेषेराव (बापू) जगताप
नगरपंचायत, वडवणी
उपनगराध्यक्ष
श्री.बन्सी (भाऊ) मुंडे
नगरपंचायत, वडवणी
मुख्याधिकारी
श्री.निगळ साहेब
नगरपंचायत, वडवणी


राज्य लोकतंत्र
पाचव्या वर्धापन दिनानिमित्त
व गुढीपाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा...
---: शुभेच्छुक :---
प्रा.सुरेश नवले मित्रमंडळ
महाराष्ट्र, बीड


राज्य लोकतंत्र
पाचव्या वर्धापन दिनानिमित्त
व गुढीपाडव्यानिमित्त
हार्दिक शुभेच्छा
* शुभेच्छुक *
अनिल दादा जगताप
शिवसेना जिल्हाप्रमुख, बीड

# पाच लाख शेतकऱ्यांकडील सोयाबीनची खरेदी शिल्लक?

## पणनमंत्र्यांचा मोठा खुलासा



मुंबई : सुमारे पाच लाख शेतकऱ्यांची सोयाबीन खरेदी शिल्लक आहे. एकूणच खरेदी प्रक्रियेतील दिरंगाईमुळे शेतकऱ्यांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागला. तसेच सोयाबीनचा दर्जा अयोग्य असल्याचे कारण देत खरेदी नाकारण्यात आल्याचा मुद्दा मंगळवारी (दि.१७ मार्च) विधानपरिषदेत उपस्थित करण्यात आला. त्यावर पणनमंत्री जयकुमार रावल यांनी ही माहिती खरी नसल्याचा खुलासा केला आहे.

केंद्र शासनाच्या किमान आधारभूत योजनेंतर्गत राज्यात सोयाबीन खरेदीसाठी ३० ऑक्टोबर २०२५ पासून शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी व १५ नोव्हेंबर २०२५ पासून प्रत्यक्ष खरेदी सुरू करण्यात आली. सदर खरेदीचा ९० दिवसांचा कालावधी १२ फेब्रुवारी २०२६ पर्यंत होता. राज्यात खरेदीच्या शेवटच्या दिवसाअखेर नाफेड आणि एनसीसीएफ यांच्यावतीने ९३४ खरेदी केंद्रांमार्फत एकूण २ लाख ३८ हजार ९१६ शेतकऱ्यांकडून ६.२० लाख टन सोयाबीन खरेदी करण्यात आली आहे. सोयाबीन खरेदीकरिता १ महिन्याची मुदतवाढ देण्यासाठी २४ फेब्रुवारी, २०२६ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास विनंती करण्यात आली आहे, असे पणनमंत्री रावल यांनी लेखी उत्तरात म्हटले आहे. याबाबत आमदार सदाभाऊ खोत, प्रविण दरेकर, प्रसाद लाड, उमा खापरे, अमित गोरखे, चित्रा वाघ आणि इतरांनी प्रश्न उपस्थित केले होते. सांगली जिल्ह्यात झालेल्या सततच्या पावसामुळे यंदाच्या खरीप हंगामातील सोयाबीन पिकाच्या उत्पादनात मोठ्या प्रमाणात घट झाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत आला आहे. शेतकऱ्यांच्या सोयाबीन पिकाला योग्य दर मिळावा यासाठी शासनामार्फत हमीभावाने सोयाबीन खरेदी करणे आवश्यक असतानाही १५ नोव्हेंबर २०२५ पासून हमीभावाने सोयाबीन खरेदी सुरू झाली. १८.५० लाख टन उद्दिष्ट असताना दीड महिन्याच्या कालावधीत तुलनेत केवळ पाच लाख टन सोयाबीनची खरेदी झाली. केवळ दर्जा अयोग्य असल्याचे कारण देऊन खरेदी नाकारली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच गतवर्षी राज्यात प्रथमच सुमारे ५ लाख ११ हजार ६५७ शेतकऱ्यांकडून ११.२१ लाख टन सोयाबीनची हमीभावाने खरेदी करण्यात आली होती. यावर्षी मात्र अवकाळी पावसामुळे सोयाबीन भिजणे, आर्द्रतेचे प्रमाण वाढणे व सोयाबीन काळे पडणे या कारणांमुळे १८० कोटी रुपये किमतीची सुमारे ६.८१ लाख पोती (सव्वातीन लाख टन) सोयाबीन खरेदीस नाकारण्यात आली. यामुळे शेतकऱ्यांना बाजारात कवडीमोल दराने सोयाबीन विकावे लागले, ही बाब खरी आहे काय? असे मुद्दे त्यांनी उपस्थित केले होते.

त्यावर पणनमंत्र्यांनी ही माहिती खरे नसल्याचे लेखी उत्तरात म्हटले आहे. सांगली जिल्ह्यात विष्णू आण्णा सहकारी खरेदी विक्री संघ लि. सांगली व आर. आर. पाटील शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघ मर्या., तासगाव येथील केंद्रांवर सोयाबीन खरेदी करण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक निकषांनुसार सरासरी गुणवत्ता (एफएक्यू) दर्जाचा सोयाबीन खरेदी करण्यात आला असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. केंद्र शासनामार्फत सोयाबीन पेंडवर सद्य:स्थितीत कोणतीही निर्यातबंदी लागू केलेली नाही. सदर धोरणात कोणताही बदल झाल्याचे दिसून येत नाही, असेही पणन मंत्री रावल यांनी पुढे म्हटले आहे.

## असे करा धान्य साठवणुकीचे व्यवस्थापन

शेतमालाची कापणी झाल्यानंतर बरेच शेतकरी शेतमालाला जास्त भाव मिळावा म्हणून धान्य साठवून ठेवतात. पण अशास्त्रीय साठवणूक, कीटक, उंदीर, सूक्ष्मजीव इत्यादींमुळे शेतमालाचे मोठे नुकसान होते. साधारण हे नुकसान एकूण अन्नधान्यांपैकी सुमारे १० टक्के आहे. साठवलेल्या धान्यावर अनेक कीटकांचा हल्ला होतो. यावरून काळजीपूर्वक साठवणुकीचे महत्त्व सहज लक्षात येते. अन्नधान्य आणि कृषी संघटनेच्या अहवालानुसार (२०१६), घरगुती स्तरावर केलेल्या साठवणूकीतील अन्नधान्यांचे सुमारे ४० ते ५० टक्क्यापर्यंत नुकसान होते. यामुळे अन्नधान्यांच्या उत्पादनासाठी घेतलेली मोठी मेहनत वाया जाते. अन्नसुरक्षेच्या दृष्टीने ही समस्या अत्यंत मोठी आहे. त्यामध्ये साठवणूकीतील किडीचा मोठा वाटा आहे. साधारणपणे कीटक जवळच्या शेतातून, फार्म स्टोअर हाऊसमधून उडतात आणि साठवलेल्या धान्यांवर अंडी घालणे सुरू करतात . किडी अन्नधान्याची नासाडी करतात आणि त्याचास परिणाम बियाच्या अंकुरणक्षमतेवर सुद्धा होतो.

वातावरणातील आर्द्रता व तापमान यांचे महत्त्व : साठवणुकीत बियाण्याची उगवण क्षमता व जोम यावर प्रामुख्याने बियाण्यातील ओलाव्याचे किंवा वातावरणातील आर्द्रतेचे प्रमाण, तापमान, वायू व बियाण्याची भौतिक स्थिती याचा परिणाम होतो. यांपैकी वातावरणातील आर्द्रता जास्त असल्यास त्यात साठवलेल्या बियाण्यातील ओलाव्याचे प्रमाणही वाढते. सर्वसाधारणपणे बियाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १२ टक्क्यांपेक्षा जास्त वाढल्यास ते बियाण्याच्या अंकुरणक्षमतेला हानिकारक असते.

बुरशीमुळे होणारा उपद्रव : अतिसूक्ष्म जीवाणू व बुरशी याचा धान्य भांडारातील बियाण्यावर अनिष्ट परिणाम होतो. वेगवेगळ्या बुरशींच्या प्रकारांपैकी ॲस्परजीलस व पेनिसिलीयम या प्रकारच्या बुरशीच्या निरनिराळ्या जाती आहेत त्या मुख्यत धान्य भांडारात बियाण्यांना जास्त अपाय पोहोचवतात. या बुरशीमुळे बियाण्यांची उगवण शक्ती कमी होते आणि बियांच्या अथवा त्यांच्या अंकुराच्या रंगात बदल होतो, बियांत विषारी बुरशीजन्य द्रव्ये तयार होतात त्यांना कुबट वास येतो आणि त्या केकसारख्या एकमेकांना घट्ट चिकटून बसतात. या प्रकारच्या नुकसानीमुळे बिया कुजतात.

किडींचा प्रादुर्भाव : भांडारात किडींची संख्या जास्त झाली तर भांडारातील तापमान, आर्द्रता व कार्बन डाय ऑक्साईड वायूचे प्रमाण वाढते. किडींच्या प्रादुर्भावामुळे बियांची उगवण शक्ती अनेक मार्गांनी कमी होते. अळ्या अथवा किडी मुख्यतः बियांतील अंकुर खातात. किडीमुळे बियांमध्ये बुरशीचा सुद्धा प्रादुर्भाव होतो. कित्येक वेळा किडी बियांत कोष अथवा जाळ्या तयार करतात. त्यामुळे बियाणे स्वच्छ करताना अडथळा येतो व बरेचसे बियाणे वायाही जाते. त्याचप्रमाणे किडीच्या नायनाटासाठी वापरलेल्या औषधांचा बियाण्यांच्या उगवण शक्तीवर अनिष्ट परिणाम करतात.



## गायींचे काही महत्वाचे रोग आणि त्यावर घरगुती उपाय!



राज्यात दूध उत्पादक शेतकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. मात्र, शेतकरी अनेकदा गायींना होणारे आजार आणि त्यांच्या आरोग्याकडे विशेषत्वाने लक्ष देत नाहीत. ज्यामुळे दुधाळ गायींना नकळत अनेक आजार जडतात. परिणामी, गायींच्या आरोग्यावर परिणाम होऊन दूध उत्पादनाला मोठा फटका बसतो. विशेष म्हणजे दररोज गायींकडे निरीक्षणातून या आजारांवर लक्ष ठेवले जाऊ शकते. तसेच काही घरगुती उपाय करून देखील दुधाळ जनावरांवर बरे केले जाऊ शकतात.

आर्थिक फटका बसतो : दुग्ध व्यवसाय करताना शेतकऱ्यांना गायींना होणाऱ्या आजारांच्या घरगुती उपायांबद्दल माहिती असेल. तर शेतकरी आपल्या गायींना निरोगी ठेवण्यात सक्षम राहू शकतात. याउलट शेतकऱ्यांना माहिती नसेल तर एखादा छोटा आजार देखील मोठे रूप धारण करू शकतो. ज्यातून शेतकऱ्यांना मोठा आर्थिक तोटा होण्याची शक्यता आहे. ज्यामुळे पशुपालन व्यवसाय करताना पुढील आजारांबाबत माहिती असणे आवश्यक असते.

शरीराला गोचीड होणे : गाईंना त्यांच्या शरीराला गोचीड झाल्यास, कडुलिंबाची पाने गरम पाण्यात चांगली उकळून घ्यावीत. आणि ते पाणी चांगले थंड झाल्यानंतर त्याची फवारणी गायींच्या अंगावर करावी. हा उपक्रम नियमित करायचा. ज्यामुळे गायींना होणाऱ्या गोचीडची समस्या पूर्णपणे संपुष्टात येते.


निमोनिया आजार : निमोनिया हा आजार दुधाळ गायींसाठी खूप त्रासदायक असतो. पशुवैद्यकीय डॉक्टरांच्या मते, गायी जास्त काळ पाण्यात भिजल्यास न्यूमोनिया होतो. न्यूमोनियामुळे गाईच्या शरीराचे तापमान वाढते. श्वास घेण्यास त्रास होतो आणि नाकातून पाणी वाहू लागते.

ही लक्षणे गायीमध्ये दिसल्यास टर्पेन्टाइन तेल उकळत्या पाण्यात टाकावे आणि वाफ जनावराने आत घ्यावी. यासोबत मोहरीच्या तेलात कापूर मिसळून जनावरांच्या बरगड्यांची मालिश करावी. हिवाळ्यात गाईला न्यूमोनियापासून वाचवण्यासाठी तिला गरम वाफ द्यावी.

जार न पडणे : गाय व्यायल्यानंतर पुढील पाच तासांत जार पडणे आवश्यक असते. असे झाले नाही तर गाय दूधही देत नाही. त्यामुळे वेळेत जार न पडल्यास ताबडतोब पशुवैद्यकीय डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. यासोबतच दुधाळ गायीचा मागील भाग गरम पाण्याने धुवावा. असे करताना कोणत्याही परिस्थितीत जाराला स्पर्श करू नये किंवा जार खेचण्याचा प्रयत्न करू नये.

शरीराला जखम झाल्यास : दुधाळ गाय किंवा म्हैस यांना दुखापत झाल्यास, त्यावर तात्काळ इलाज करणे आवश्यक असते. त्यासाठी गायीला किंवा म्हशीला जखम दिसल्यास तात्काळ गरम पाण्यात फिनाईल किंवा पोटॅश टाकून स्वच्छ करावे. त्यामुळे जखमेत किडे असल्यास, टर्पेन्टाइन तेलात भिजवून जनावराच्या त्या भागावर पट्टी बांधावी. तोंडाच्या जखमा नेहमी तुरटीच्या पाण्याने धुवाव्यात. पण त्याचवेळी जखमेशी संबंधित उपाय जाणून घेण्यासाठी डॉक्टरांशी वेळोवेळी संपर्क साधावा.

## गव्हाचे काड जाळण्यापुर्वी अशी घ्या काळजी



गव्हाची काढणी अंतिम टप्प्यात असताना शेतात मोठ्या प्रमाणात काड शिल्लक राहते. अनेक शेतकरी ते जाळून टाकतात, पण हा निर्णय जमिनीला मोठा फटका देऊ शकतो. राज्यात सध्या गव्हाच्या काढणीचा हंगाम अंतिम टप्प्यात आला असून बहुतांश ठिकाणी हार्वेस्टरद्वारे काढणी सुरू आहे. मात्र काढणीनंतर शेतात उरलेल्या गव्हाच्या काडाचे काय करायचे, याबाबत शेतकरी संभ्रमात आहेत. काड जाळून टाकायचे की जमिनीत गाडायचे, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. सध्या सुमारे ९० टक्के शेतकरी हार्वेस्टरने काढणी करतात. या प्रक्रियेत गव्हाचा फक्त ३० ते ४० टक्के भाग कापला जातो, तर उर्वरित ६० ते ७० टक्के काड शेतातच राहते. एका एकरात साधारण दीड ते दोन टन काड उरते. हे काड लगेच कुजत नसल्याने अनेक शेतकरी ते जाळण्याचा पर्याय निवडतात. मात्र, काड जाळल्यामुळे जमिनीच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतात. जमिनीतील उपयुक्त सूक्ष्मजीव आणि मित्रकिडे नष्ट होतात, वरचा थर कडक होतो आणि सेंद्रिय कर्बाचे प्रमाण घटते. त्यामुळे जमिनीची सुपीकता कमी होण्याचा धोका निर्माण होतो.

काड गाडणे का महत्त्वाचे?

जमिनीची सुपीकता टिकवण्यासाठी आणि दीर्घकालीन उत्पादन वाढीसाठी काड जमिनीत गाडणे हा सर्वोत्तम पर्याय मानला जातो. काड जमिनीत मिसळल्याने सेंद्रिय पदार्थ वाढतात आणि जमिनीचा पोत सुधारतो. तथापि, काड गाडण्याची प्रक्रिया योग्य वेळी करणे अत्यंत आवश्यक आहे. पुढील पीक घेण्याच्या किमान ५५ ते ६० दिवस आधी काड जमिनीत गाडले, तरच त्याचे पूर्णपणे खतात रूपांतर होते, असे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे.

काड जाळणे कधी योग्य

ज्या शेतकऱ्यांकडे पाण्याची उपलब्धता नाही, जमिनीत ओलावा नाही किंवा पुढील पिकासाठी वेळ कमी आहे, अशा परिस्थितीत काड जाळून तातडीने नांगरणी करणे काही प्रमाणात व्यवहार्य ठरू शकते. मात्र हा पर्याय केवळ अपवादात्मक परिस्थितीतच वापरण्याचा सल्ला तज्ज्ञ देतात.

काड कुजवण्यासाठी काय करावे?

गव्हाच्या काडाचे जलद विघटन करण्यासाठी खालील उपाय उपयुक्त ठरतात. काढणीनंतर रोटाव्हेटरने काड बारीक करून घ्यावे. शेतात पुरेसा ओलावा राखावा किंवा पाणी द्यावे. डीकंपोझिंग कल्चर (कुजवणारे जिवाणू) टाकावेत.१० ते १२ दिवसांनी नांगरणी करावी. या प्रक्रियेमुळे काड लवकर कुजते आणि जमिनीत सेंद्रिय अन्नद्रव्ये वाढतात.

नत्र व्यवस्थापनही गरजेचे :

गव्हाच्या काडामध्ये कर्बाचे प्रमाण जास्त असल्याने त्याचे कर्ब-नत्र गुणोत्तर जास्त असते. त्यामुळे कुजण्याच्या प्रक्रियेत जिवाणूंना जास्त नत्राची गरज भासते आणि ते जमिनीतील नत्र वापरतात. परिणामी पुढील पिकाला नत्राची कमतरता जाणवू शकते. यासाठी काड गाडताना अतिरिक्त नत्राचा पुरवठा करणे आवश्यक आहे. गव्हाच्या काडाचे व्यवस्थापन योग्य पद्धतीने केल्यास ते कचरा नसून खताचा उत्तम स्रोत ठरू शकतो. त्यामुळे जाळण्याऐवजी गाडणे हाच शाश्वत आणि फायदेशीर मार्ग आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६७४ : शिवाजी महाराजांच्या सर्वात धाकट्या पत्नी काशीबाई यांचे निधन
१८३१ : अमेरिकेमधील न्यूयॉर्क शहरात स्थित असलेल्या सिटी बँकेत सर्वप्रथम चोरीची घटना घडली होती. या जोरीमध्ये जवळपास २४५,००० डॉलर चोरीला गेले होते.
१८४२ : लोकहितवादी यांनी 'शतपत्र' या लेखनास प्रारंभ केला.
१८४८ : लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांच्या शतपत्रांपैकी पहिले पत्र मुंबईच्या 'प्रभाकर' या वृत्तपत्रात प्रसिध्द झाले.
१९३१ : अमेरिकेतील नेवाडा राज्यात जुगाराला कायदेशीर मान्यता मिळाली.
१९३२ : 'सिडनी हार्बर ब्रिज' सुरू झाला.
१९४४ : सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेने पूर्वोत्तर भारतात राष्ट्रीय ध्वज फडकाविला होता.
१९६२ : पुणे येथील राजा केळकर संग्रहालय जनतेसाठी खुले करण्यात आले.
१९७२ : भारत-बांगलादेश यांच्यात मैत्री करार झाला.
१९९८ : भारतीय जनता पार्टीचे सदस्य अटल बिहारी वाजपेयी दुसऱ्यांदा पंतप्रधान म्हणून निवडून आले होते.
२००१ : वेस्ट इंडीजचा वेगवान गोलंदाज कोर्टनी वॉल्शने दक्षिण अफ्रिकेच्या जॅक्स कॅलिसला पायचीत करुन कसोटी सामन्यातील पाचशेवा बळी मिळविला. कसोटी सामन्यांत ५०० बळी मिळवणारा तो पहिला गोलंदाज बनला.
२००३ : अमेरिकेचे अध्यक्ष जॉर्ज बुश यांनी इराकविरुद्ध युद्ध पुकारले.
२००५ : साली पाकिस्तान देशाने ''शाहीन-२'' क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली होती.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२१ : सर रिचर्ड बर्टन ब्रिटिश लेखक, कवी, संशोधक, मुत्सद्दी आणि गुप्तहेर (मृत्यू: २० आक्टोबर१८९०)
१८९७ : शंकर विष्णू तथा 'दादा' चांदेकर चित्रपट संगीतकार (मृत्यू:)
१९०० : जीन फ्रेडरिक जोलिओट मूलद्रव्याच्या समस्थानिकांच्या शोधाबद्दल नोबेल पारितोषिक (१९३५) मिळवणारा फ्रेन्च पदार्थवैज्ञानिक (मृत्यू: १४ ऑगस्ट १९५८)
१९३६ : ऊर्सुला अँड्रेस स्विस अभिनेत्री
१९३८ : सई परांजपे बालनाटय लेखिका आणि नामवंत चित्रपट दिग्दर्शिका
१९३९ : हिंदी चित्रपट क्षेत्रांतील हास्य कलाकार जगदीप यांचा जन्मदिन.
१९५४ : इंदू शहानी, भारतीय शिक्षणतज्ञ.
१९८२ : फेसबुक चे सहसंस्थापक एड्वार्डो सावेरीन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७५४ : खंडेराव होळकर, मल्हारराव होळकरांचा एकुलता एक पुत्र व अहिल्यादेवीचे पती.
१८८४ : केरुनाना लक्ष्मण छत्रे आद्य गणिती, आधुनिक भास्कराचार्य (जन्म: १६ मे १८२५)
१८९० : स्वामी दयानंद सरस्वती यांचे शिष्य तसेच, आर्य समाजाचे प्रमुख नेत्यांपैकी एक पंडित गुरुदत्त यांचे निधन.
१९२८ : महार वतन बिल मांडणी
१९७८ : भारतीय वकील आणि राजकारणी एम. ए. अय्यंगार यांचे निधन. (जन्म: ४ फेब्रुवारी १८९१)
१९८२ : जीवटराम भगवानदास तथा 'आचार्य' कृपलानी स्वातंत्र्यसेनानी, गांधीवादी, समाजवादी आणि पर्यावरणवादी (जन्म: ११ नोव्हेंबर १८८८)
१९९८ : इ. एम. एस. नंबूद्रीपाद केरळचे मुख्यमंत्री व भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते (जन्म: १३ जून १९०९)
२००२ : नरेन ताम्हाणे यष्टीरक्षक आणि फलंदाज (जन्म: ४ ऑगस्ट १९३१)
२००५ : डेलोरेअन मोटर कंपनी चे सहसंस्थापक जॉन डेलोरेअन यांचे निधन. (जन्म: ६ जानेवारी १९२५)
२००८ : सर आर्थर सी. क्लार्क विज्ञान कथालेखक व संशोधक (जन्म: १६ डिसेंबर १९१७)

## बीबीएफ लागवड तंत्रज्ञानाचा फायदा

देशाला कृषिप्रधान करणाऱ्या शेतीव्यवस्थेला प्रगतशील करण्यासाठी बी.बी.एफ. पेरणी पद्धत महत्त्वाची भूमिका बजावत आहे. निसर्गाच्या लहरीपणामुळे कधी अतिवृष्टी तर कधी कोरडा दुष्काळ याचा सामना शेतकरी करत असतात आणि याचाच परिणाम पिकांवर होऊन उत्पादनात घट होते. अशावेळी पडणाऱ्या पावसाचे जास्तीत जास्त पाणी जमिनीत मुरविणे, तसेच अधिक पावसात अतिरिक्त पाणी शेताबाहेर सुरक्षितपणे निचरा करणे, उत्पादन वाढीसाठी रुंद वरंबा सरी लागवड पद्धत फायदेशीर ठरते.

बी.बी.एफ. पेरणी पद्धत म्हणजे काय ? : हे ट्रॅक्टर चलित पेरणी यंत्र असून रुंद वरंबे व सऱ्या पाडणे, पेरणी आणि खते देणे अशी तिन्ही कामे एकाच वेळी केली जातात. यामध्ये दोन फाळ आणि पेरणीचे फण यातील अंतर गरजेनुसार कमी जास्त करता येते. तसेच सऱ्यांची रुंदीही कमी जास्त करता येते. उदा. वरंब्यावर सोयाबीन पिकाच्या ३ ते ४ ओळी ३० सें.मी. किंवा ४५ सें.मी. अंतरावर ३ ओळी घेता येतात. फाळामध्ये तयार होणाऱ्या सऱ्यांची रुंदी ३० ते ४५ सें.मी. गरजेनुसार ठेवता येते. कोरडवाहू शेतीमध्ये जलसंधारणाच्या दृष्टीने बीबीएफ पद्धत अतिशय उपयुक्त आहे. तसेच अधिक व सततच्या पावसामध्ये अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याच्या दृष्टीने बीबीएफ पद्धत उपयोगी आहे. या पद्धतीमुळे सर्वसाधारणपणे २० ते २७ टक्क्यांपर्यंत जलसंधारण तर २५ टक्के उत्पादनात वाढ दिसून आली आहे.

बी.बी.एफ. पेरणी यंत्र अशा प्रकारे फायदेशीर : बीबीएफ पेरणी यंत्राच्या सहाय्याने उतारास आडवी पेरणी केल्यास मुलस्थानी जलसंधारण होते. या पध्दतीत कोरडवाहू शेतीमध्ये जलसंधारणाच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त आहे. पावसाच्या दीर्घकालीन खंड काळात याचा लाभ होतो. अंतरपिक पध्दतीचा अवलंब करून अधिकचे उत्पन्न घेता येते. बीबीएफ पध्दतीने निविष्ठा खर्चात (बियाणे ,खते इ.) २० ते २५% बचत. खत व बियाणे एकाच वेळी पेरल्यामुळे खताचा कार्यक्षम वापर होतो. उत्पन्नामध्ये २५ ते ३०% वाढ होते. वरंब्यावर ओलावा टिकवून ठेवला जात असल्याने पर्जन्यामान खंडाच्या कालावधीत सुध्दा पाण्याचा ताणाची तीव्रता कमी होते. जास्त पर्जन्यमान झाल्यास या पद्धतीमधील सरीमधून अतिरिक्त पाणी वाहून जाण्यास मदत होते. पिकास मुबलक हवा सूर्यप्रकाश मिळाल्याने पिकाची जोमदार वाढ होऊन पीक किड रोगास बळी पडत नाही. पिकामध्ये अंतर मशागत करणे उभ्या पिकांस सरी मधून ट्रॅक्टर/मनुष्य चलीत फवारणी यंत्राव्दारे किटकनाशक फवारणे शक्य होते.




राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
गुरूवार दि.१९ मार्च २०२६






# थकीत वीज बिलाची अट शिथिल करा ; सोलर योजनेत अडथळा

## आ. लोणीकर यांची विधानसभेत मागणी

जालना । प्रतिनिधी

केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून राबविण्यात येणारी सौर ऊर्जा (सोलर) योजना सर्वसामान्य नागरिकांसाठी लाभदायक ठरत असताना, ''गेल्या ५ ते १० वर्षांतील थकीत वीज बिल भरल्याशिवाय सोलर बसवता येणार नाही'' ही अट अंमलबजावणीत मोठा अडथळा ठरत असल्याचे मत आमदार बबनराव लोणीकर यांनी महाराष्ट्र विधानसभेत व्यक्त केले. ही अट तात्काळ शिथिल करण्याची त्यांनी जोरदार मागणी केली.

लोणीकर यांनी सभागृहात सांगितले की, सौर ऊर्जा हा स्वस्त, शाश्वत आणि भविष्यातील ऊर्जा पर्याय असून केंद्र सरकारच्या पुढाकारातून घरांवर तसेच शासकीय इमारतींवर सोलर बसवण्याच्या योजना प्रभावीपणे राबवल्या जात आहेत. सध्या १२ ते १५ रुपये प्रति युनिट दराने मिळणारी वीज सोलरमुळे अत्यल्प खर्चात उपलब्ध होऊ शकते. तसेच त्यांनी स्पष्ट केले की, विविध घरकुल योजनांतील



लाभार्थ्यांना सौर ऊर्जा योजनेचा आस्वालार्थ (पूरक) लाभ देण्यात येत आहे. यामध्ये पंतप्रधान आवास योजना (ग्रामीण व शहरी), माता रमाई घरकुल योजना, शबरी घरकुल योजना, देवी अहिल्याबाई होळकर घरकुल योजना, यशवंतराव चव्हाण घरकुल योजना (भटके विमुक्त व बंजारा समाजासाठी), तसेच मोदी आवास योजना या योजनांतील लाभार्थ्यांना सोलर योजनेचा लाभ घेता येतो. या घरकुल लाभार्थ्यांसाठी केंद्र सरकारकडून सुमारे ३५% आणि राज्य सरकारकडून सुमारे १५% अनुदान उपलब्ध आहे. सौर ऊर्जा योजनेच्या अनुदानाबाबत त्यांनी सांगितले की, शाळा, महाविद्यालये, पोलीस स्टेशन, बँका, पतसंस्था तसेच व्यापारी, डॉक्टर आणि वकील यांना केंद्र सरकारकडून ३५ टक्के सबसिडी उपलब्ध आहे. ही सबसिडी प्रामुख्याने केंद्र सरकारकडून दिली जाते; राज्य सरकारकडून सर्व घटकांना समान स्वरूपात सबसिडी दिली जात नाही, विशेषतः मोठ्या व सक्षम घटकांना राज्य अनुदान लागू होत नाही. लोणीकर यांनी पुढे माहिती देताना सांगितले की, सोलर योजनेच्या अंमलबजावणीसाठी पहिल्या टप्प्यात काही निवडक गावांची निवड करण्यात आली आहे. यात आष्टी, सातोना, वाटूर, नेर, शेवली आणि तळणी या गावांचा समावेश असून या सर्व गावांना पूर्णपणे सौरऊर्जेवर आणण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. याशिवाय, जिल्ह्यात जे गाव सर्वप्रथम पूर्णपणे सोलरवर येईल त्या गावाला ३ कोटी रुपयांचे बक्षीस देण्यात येणार असून अशा प्रकारे क्रमाने एकूण तीन बक्षिसे दिली जाणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

लोणीकर यांनी आपल्या मतदारसंघातील परिस्थिती स्पष्ट करताना सांगितले की, मतदारसंघात सुमारे ४२ हजार घरकुलांना मंजुरी मिळाली आहे, तसेच ५ हजारांहून अधिक लोकसंख्या असलेली अनेक मोठी गावे आहेत. अशा सुमारे दहा गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती व नोंदणी कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमांना २ हजारांहून अधिक घरकुल लाभार्थी सहभागी झाले, तसेच ३ हजारांपेक्षा जास्त नागरिक उपस्थित होते. यावेळी महावितरण व वीज वितरण कंपनीचे अधिकारीही उपस्थित होते.

या कार्यक्रमांना मोठा प्रतिसाद मिळूनही, प्रत्यक्ष अंमलबजावणीत मात्र प्रगती होऊ शकली नाही. याचे मुख्य कारण म्हणजे ''थकीत वीज बिल भरल्याशिवाय सोलर बसवता येणार नाही'' ही अट असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या कामात येणारे तांत्रिक व प्रशासकीय अडथळे जसे की ५ ते १० वर्षांचे थकीत वीज बिल भरण्याची अट याबाबतची सर्व माहिती संकलित करण्यात आली असून, हे अडथळे दूर करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. ''ही अट शिथिल केल्याशिवाय सोलर योजनेचे उद्दिष्ट पूर्ण होणार नाही. नागरिकांना दिलासा देण्यासाठी सरकारने तातडीने निर्णय घ्यावा,'' असे त्यांनी ठामपणे सांगितले. यासंदर्भात ते लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन लेखी निवेदन सादर करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. शेवटी, शासकीय कार्यालये, बँका, शाळा व महाविद्यालयांवर सोलर प्रकल्प उभारणे ही काळाची गरज असल्याचे अधोरेखित करत, थकीत वीज बिलाची जाचक अट शिथिल करून अधिकाधिक नागरिकांना सौर ऊर्जा योजनेचा लाभ मिळावा, यासाठी सरकारने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी मागणी लोणीकर यांनी केली.

## भक्तीच्या शक्तीतून समाजात एकात्मता - भास्कर आबा दानवे



जालना । प्रतिनिधी

दत्तनगर, जालना येथे अखंड हरिनाम सप्ताहाच्या समाप्तीनिमित्त आयोजित शिवपुराण महाकथा व तुलसी अर्जुन सोहळा कथावाचक ह.भ.प. श्री गिरी महाराज यांच्या मधुर वाणीतून संपन्न झाला. यावेळी ह.भ.प. श्री शिवाजी महाराज पवार यांचे काल्याचे कीर्तन पार पडले. या सोहळ्यास भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक भास्कर आबा दानवे यांनी उपस्थित राहून सर्व भाविक भक्तांशी संवाद साधला व संतांचे आशीर्वाद घेतले.

यावेळी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक भास्कर आबा दानवे यांनी सांगितले की, अशा धार्मिक कार्यक्रमांमुळे समाजात एकात्मता आणि सद्भावना वाढीस लागते, संत परंपरेतून समाजाला सदाचार, संस्कार आणि मानवतेचा संदेश मिळत असतो. अशा धार्मिक उपक्रमांमुळे नव्या पिढीमध्ये चांगले विचार रुजतात आणि समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. दत्तनगर परिसरात इतक्या मोठ्या प्रमाणावर भक्तीमय कार्यक्रमाचे आयोजन करणे ही अभिमानाची बाब आहे. भविष्यातही अशा उपक्रमांमुळे समाजातील बंधुभाव अधिक दृढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी जालना शहर महानगरपालिका स्थायी समिती सभापती अशोक अण्णा पांगरकर, माजी जिल्हाध्यक्ष बद्रीभाऊ पठाडे, नगरसेवक सिद्धिविनायक मुळे, नगरसेविका श्रीमती सुशीलाताई दानवे, रवी राऊत, विष्णू बापू डोंगरे, गोवर्धन कोल्हे, देविदास देशमुख, राजेश जोशी, बबन शिरसाठ, निवृत्ती लंके आदींची उपस्थिती होती.

## इफ्तार पार्टी म्हणजे हिंदू - मुस्लिम एकतेचे प्रतीक - सभापती बोराडे

मंठा । प्रतिनिधी

हिंदू आणि मुस्लिम बांधवांचे सर्व सण हे बंधुभाव, शांतता व जातीय सलोखा वाढवतात, इफ्तार पार्टी म्हणजे हिंदू मुस्लिम एकतेचे प्रतीक आहे असे प्रतिपादन शिवसेना जिल्हाप्रमुख तथा बाजार समितीचे सभापती ए. जे. बोराडे यांनी केले. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने येथील मर्कस मस्जिदमध्ये मंगळवार दि.१७ रोजी आयोजित इफ्तार पार्टीच्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उपसभापती गोपाळराव बोराडे, बाजार समितीचे संचालक प्रल्हादराव बोराडे, संतोष वरकड, गणेश राव बोराडे, किसनराव मोरे, उदयसिंह बोराडे, संचालक मुस्तफा पठाण, योगेश अवचार, भारतसेठ बोराडे, बाजार समितीचे सचिव रमेश बोराडे, नगरसेवक अचित बोराडे, हाजी इरफानभाई, हाजी मुसा कुरेशी, कयूमभाई कुरेशी, सिराजखान पठाण, शबाब कुरेशी, बाजखा पठाण, कबीर तांबोळी, जे. के. कुरेशी, उबेद बागवान, इलियास कुरेशी, सय्यद एजाज, तुळशीराम कोहीरे, भगवान बोराडे, पप्पू दायमा यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना ए जे बोराडे म्हणाले की, एकत्रित सण साजरे केल्यामुळे प्रेम, करुणा आणि माणुसकी वाढवण्यास मदत होते. अशा सणामुळे सर्वधर्मीय एकत्र येतात ही परंपरा पुढे चालू ठेवणार असे सांगितले. उपसभापती गोपाळराव बोराडे यांनी सांगितले की, मंठा शहरातील मुस्लिम बांधव शांतताप्रिय असून मुस्लिम बांधवांसोबत प्रेमाचे नाते निर्माण झाले आहे असे म्हणाले. या इफ्तार पार्टीच्या कार्यक्रमाला शहरातील सर्व मुस्लिम बांधव, हिंदू बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुस्लिम बांधवांच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.


## जिल्हा लोकअदालतीत ७१३ प्रकरणे निकाली

### १४ कोटी ३३ लाखाहून अधिक तडजोड शुल्क वसूल

जालना । प्रतिनिधी

उच्च न्यायालय, मुंबई व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार जालना जिल्ह्यात शनिवार रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या लोकअदालतीमध्ये एकूण ७१३ प्रकरणांचा निपटारा करण्यात आला असून, तब्बल १४ कोटी ३३ लाख ७७ हजार ४५० रुपयांचे तडजोड शुल्क वसूल करण्यात आले आहे.

लोकअदालतीचे उद्घाटन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती वर्षा एम. मोहिते यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी जिल्हा न्यायाधीश-०३ के.व्ही. मोरे, तदर्थ जिल्हा न्यायाधीश-०१ जी.आर. ढेपे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव नितेश बंडगर, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष परमेश्वर गडगीळे, जिल्हा सरकारी अभियोक्ता बाबासाहेब इंगळे व इतर न्यायालयीन अधिकारी उपस्थित



होते. जालना जिल्ह्यातील विविध न्यायालयांमध्ये एकूण ३१८५६ प्रकरणे लोकअदालतीसाठी ठेवण्यात आली होती. यामध्ये दिवाणी, फौजदारी, मोटार अपघात, भूसंपादन, एन.आय. ॲक्ट कलम १३८ आणि दावा दाखलपूर्व प्रकरणांचा समावेश होता. या लोकअदालतीचे विशेष यश म्हणजे कौटुंबिक वादातील दोन प्रकरणे सामोपचाराने सुटली. परिणामी, दोन विभक्त राहणाऱ्या महिला पुन्हा आपल्या पतीच्या घरी नांदायला गेल्या असून दोन विखुरलेले संसार पुन्हा सुखाने बहरले आहेत. प्रलंबित प्रकरणे ६३०० प्रकरणांपैकी ५१० प्रकरणे निकाली निघाली. अशा प्रकारे एकूण ७१३ प्रकरणे तडजोडीने यशस्वीरित्या मिटवण्यात आली. दाखलपूर्व प्रकरणी २५,५५६ प्रकरणांपैकी २०३ प्रकरणे निकाली निघाली. ही लोकअदालत यशस्वी करण्यासाठी जिल्ह्यातील न्यायालयीन कर्मचारी, बँक अधिकारी, पोलीस प्रशासन, उपप्रादेशिक परिवहन विभाग आणि वकील संघाच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. असे सदस्य सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांनी कळविले आहे.

## खरवंडी येथे साई गणेश पेट्रोल पंपाचे उद्घाटन संपन्न

पाथर्डी । प्रतिनिधी

खरवंडी कासार येथे मुंबई विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ हॉटेल साई संदेश शेजारी साई गणेश पेट्रोल पंपाचे उद्घाटन भगवानगडाचे आचार्य नारायण स्वामी महाराज यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी साई गणेश पेट्रोल पंपाचे संचालक मेजर पांडुरंग शिरसाठ, ज्येष्ठ नेते भगवानराव दराडे, मालेवाडीचे सरपंच सुनील खेडकर, राष्ट्रवादी श.प.गटाचे युवक तालुका अध्यक्ष महारुद्र किर्तने, माणिक खेडकर, दीपक ढाकणे, गणेश जवरे यांसह भगवानगड परिसरातील असंख्य मान्यवर उपस्थित होते. साई गणेश पेट्रोल पंप खरवंडी कासार आणि परिसरातील ग्राहकांच्या पसंतीस लवकरच उतरेल. शुद्ध पेट्रोल, डिझेल यासह लवकरच सीएनजी गॅसची व्यवस्था होणार असल्याने लोहा - कंधार- मुंबई - विशाखापट्टणम या राष्ट्रीय महामार्गाचा ट्रँगल खरवंडी कासार येथून जात असल्याने परिसरातील ग्राहकांना २४ तास इंधन उपलब्ध होणार आहे, असे साई गणेश पेट्रोल पंपाचे संचालक मॅनेजर पांडुरंग शिरसाठ यांनी सांगितले.

## ज्ञानभूमी ज्ञानाचे प्रतीक व्हावी - डॉ. आंबेडकर यांचे प्रतिपादन

अंबड । प्रतिनिधी

१५ मार्च रोजी महात्मा फुले नगर, अंबड येथील ज्ञानभूमी बुद्ध विहार येथे भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी डॉ. भीमराव यशवंतराव आंबेडकर यांनी ''ज्ञानभूमी ही ज्ञानाचे प्रतीक व्हावी'' असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाची सुरुवात अंबड येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पमाला अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर समता सैनिक दलाची शिस्तबद्ध रॅली काढण्यात आली. या रॅलीत बँड पथकासह पुरुष व महिला सैनिक, तसेच पंचक्रोशीतील मोठ्या संख्येने बौद्ध उपासक-उपासिका आणि बालकांचा उत्स्फूर्त सहभाग होता. रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून ज्ञानभूमी येथे दाखल झाली. ज्ञानभूमी येथे पोहोचताच भंते राजरत्न थेरो यांनी तयार केलेल्या 'माया ध्वजाचे' उद्घाटन



डॉ. आंबेडकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सुमारे ३०० समता सैनिकांनी लेफ्टनंट कर्नल कुणाल दहिवले यांच्या नेतृत्वाखाली मानवंदना दिली. तसेच भगवान गौतम बुद्धांच्या पुतळ्याच्या कोनशिलेचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. भारतीय बौद्ध महासभा तालुका कार्यकारिणी फलक व ज्ञानभूमी बुद्ध विहार समितीच्या फलकाचेही अनावरण झाले. विचारमंचावर मान्यवरांच्या उपस्थितीत भगवान बुद्ध व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. भंते राजरत्न थेरो यांनी उपस्थितांना त्रिशरण व पंचशील दिले. आपल्या भाषणात डॉ. आंबेडकर यांनी ज्ञानभूमीचा सर्वांगीण विकास करण्याचे आवाहन केले. ''येथे यशवंत वाचनालय आधुनिक सुविधांनी युक्त ई-ग्रंथालयात रूपांतरित व्हावे. स्त्री-पुरुषांनी वाचन संस्कृती वाढवून समाजासाठी आदर्श कार्य करावे. परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून हरित वातावरण निर्माण करावे. तसेच आर्किटेक्टच्या सल्ल्याने भव्य इमारती उभारून विविध स्तरांवरील शिबिरे वर्षभर आयोजित करावीत,'' अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमास भारतीय बौद्ध महासभेचे विविध पदाधिकारी, समता सैनिक दलाचे अधिकारी व सैनिक, तसेच जालना जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांचीही लक्षणीय उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुकाध्यक्ष उत्तमराव येडे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. डोणगावकर व ज्योतीताई खरात यांनी केले, तर आभार प्रदर्शन कोषाध्यक्ष भास्करराव गाडगे यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता शांततेत व उत्साहात करण्यात आली.

जाहिर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. ३९३/२०२६**
**मधुकर सुभाषराव लोंखंडे विरुद्ध**
**ग्रामपंचायत कार्यालय नेकनुर**

पहा

मधुकर सुभाषराव लोंखंडे रा.नेकनुर ता. जि. बीड ह.मु.पुणे

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्मधारक मधुकर सुभाषराव लोंखंडे यांचा दिनांक १०/०९/१९८४ रोजी जन्म झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहून येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालयस नेकनुर ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे नेकनूर ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक १८/०३/२०२६ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १८/०४/२०२६ ही आहे

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**




























This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# ५८ आक्षेपार्ह व्हिडीओ, लैंगिक शोषणाचे आरोप; त्याच अशोक खरातची पाद्यपूजा

पुणे । प्रतिनिधी

नाशिकमधील बहुचर्चित अशोक खरात उर्फ कॅप्टन या भोंदूगिरी करणाऱ्या मांत्रिकाला क्राइम ब्रांच युनिट एकने अटक केली आहे. अशोक खरातने गुंगीचे औषध देऊन एका महिलेवर बलात्कार केल्याप्रकरणी नाशिकच्या सरकारवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. महत्त्वाची बाब म्हणजे या भोंदूबाबाकडे अनेक राजकीय नेते, अधिकारी, सेलिब्रिटी आपले भविष्य जाणून घेण्यासाठी जात होते. त्यांचे व्हिडीओही पोलीस तपासात उघडकीस आले आहेत. त्यामुळे राज्यात एकच खळबळ उडाली आहे. या भोंदू बाबाच्या संदर्भात ५८ आक्षेपार्ह व्हिडीओ, लैंगिक शोषणाचे आरोप असून, त्याच अशोक खरातची पाद्यपूजा करण्यात आल्याचा प्रकार घडला आहे.



सिन्नर तालुक्यात अशोक खरात याने श्री शिवनिका संस्थान या मंदिराची स्थापना केली आहे. या मंदिराच्या विश्वस्त पदावर महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर (ठींरिश्रळ उहरज्ञरपज्ञरी) आहेत, तर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांनीही या मंदिरात जाऊन दर्शन घेतले होते, तेव्हापासून अशोक खरात जास्त चर्चेत आला होता. आता अशोक खरातचे पाद्यपूजन करतानाचे रुपाली चाकणकरांचे फोटोही समोर आले आहेत. या सगळ्या प्रकरणावर आता रुपाली चाकणकरांनी प्रतिक्रिया दिली आहे. शिवनिका संस्थान ट्रस्ट हे महादेव देवस्थानचे ट्रस्ट असून काहीवेळा तिथे सामाजिक कार्यक्रम साजरे होतात, त्यामुळे सामाजिक कामांच्या निमित्ताने आम्ही अनेक जण ट्रस्टच्या कामाशी जोडले गेले होतो. ज्यात समाजातील अनेक प्रतिष्ठित व्यक्ती आहेत. कॅप्टन खरात यांच्या वैयक्तिक आयुष्य किंवा त्यांच्यावर झालेल्या आरोपांबाबत मला कल्पना नाही,आता जे आरोप होत आहेत त्याबाबत पोलीस निष्पक्षपणे चौकशी करतील,पोलीस तपासावर माझा पूर्ण विश्वास आहे, असं रुपाली चाकणकर म्हणाल्या. दरम्यान, कॅप्टन अशोक खरात नावाच्या स्वयंघोषित ज्योतिषाला आज नाशिक पोलिसांनी अटक केली. खरात याच्यावर बलात्कार यासारखे आरोप आहेत. पोलिसांनी हस्तगत केलेल्या पेन ड्राईव्ह मधून ५८ आक्षेपार्ह व्हिडिओ पोलिसांनी हस्तगत केल्याची माहिती समोर येत आहे. हे उल्लेखनीय आहे की या स्वयंघोषित ज्योतिषाकडे अनेक राजकीय नेत्यांचा राबता होता. केसरकर तटकरे चाकणकर अशी काही राजकीय भक्तांची नावे...नेक राजकीय नेत्यांनी या ज्योतिषाच्या सांगण्यावर वेगवेगळ्या पूजा करणे, स्वतःच्या हाताची करंगळी कापून घेणे असे अघोरी उद्योग सुद्धा केल्याचे लोक चर्चा करत आहेत. विशेष यापूर्वी सुद्धा अशोक खरात याच्यावर जेव्हा लैंगिक शोषणाचे आरोप एका संस्थेने केले तेव्हा चाकणकर यांनी आपल्या पदाचा दुरुपयोग करत संबंधित संस्थेकडून दबाव आणून माफीनामा घेतला होता, असं सुषमा अंधारे म्हणाल्या. विशेष खरात यांनी स्थापन केलेल्या संस्थेवर रूपाली चाकणकर संचालक म्हणून काम करतात. खरात याच्या घरच्या लग्न कार्यामध्ये चाकणकर जातीने आवभगत करताना बघून अनेकांना आश्चर्य वाटले होते. आता आम्हाला शंका नव्हे भीती आहे, पुन्हा एकदा महिला आयोगासारख्या अत्यंत जबाबदार पदाचा दुरुपयोग करत रूपाली चाकणकर यांनी अशा लिंगपिसाट माणसाला मदत केली तर याची जबाबदारी कोण घेणार ? कारण अशा भामट्या ज्योतिष्यासाठी स्वतः छत्री घेऊन चाकणकर उभ्या आहेत. योगायोगाने राज्याच्या उपमुख्यमंत्री पदावर याच पक्षाच्या नेत्या सुनेत्रा वहिनी विराजित आहेत. महिला म्हणून सुनेत्रा वहिनींच्या मनाला तरी ही गोष्ट पटते का? की अशा लिंग पिसाट माणसाला पाठीशी घालणाऱ्या चाकणकरांना या पदावर ठेवावे...?, असा सवालही सुषमा अंधारे यांनी उपस्थित केला आहे.अशोक खरात याच्याविरुद्ध अत्याचाराचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. नाशिकमध्ये सरकारवाडा पोलिसांत हा गुन्हा दाखल करण्यात आला होता. अशोक खरात याने एका ३५ वर्षीय महिलेवर गुंगीचे औषध देऊन बलात्कार (ठरशि पशीु) केल्याच्या आरोपाखाली त्याच्यावर कारवाई करण्यात आली आहे. बुधवार १८ मार्च रोजी खरात याला पहाटे तीन वाजताच्या सुमारास गुन्हे शाखेकडून ताब्यात घेण्यात आले. अशोक खरात हा सिन्नर तालुक्यात मिरगाव येथील श्री ईशान्येश्वर मंदिर ट्रस्टचा अध्यक्ष आहे. तो मर्चंट नेव्हीतून निवृत्त झाला आहे. गेल्या काही वर्षांमध्ये कॉस्मॉलॉजी एक्स्पर्ट आणि अंकशास्त्रज्ञ म्हणून तो नावारुपाला आला. अनेक बडे राजकीय नेते, सेलिब्रिटी आणि उद्योजक त्याच्याकडे मार्गदर्शनासाठी जातात. मात्र, त्याला बलात्काराच्या आरोपाखाली अटक करण्यात आल्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

## पुणे जिल्हा परिषद अध्यक्षपदी वीरधवल जगदाळे; उपाध्यक्षपदी वळसे पाटील बिनविरोध

पुणे । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे दौंड तालुक्यातील ज्येष्ठ सदस्य वीरधवल जगदाळे, तर आंबेगाव तालुक्यातील विवेक वळसे पाटील यांची उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. जिल्हा परिषदेत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी सर्वसाधारण सभा बोलावण्यात आली होती.



उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या वेळेत राष्ट्रवादी काँग्रेसकडून अध्यक्षपदासाठी वीरधवल जगदाळे, तर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे गटनेते ड. विजयसिंह शिंदे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. उपाध्यक्षपदासाठी राष्ट्रवादी काँग्रेसकडून विवेक वळसे पाटील, तर शिवसेना (शिंदे गट)चे मंगेश काकडे यांनी अर्ज दाखल केला. दुपारी तीन वाजता झालेल्या सर्वसाधारण सभेच्या कामकाजाच्या सुरुवातीपूर्वी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर दाखल उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात आली असून सर्व अर्ज वैध ठरले. यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी निवडणूक प्रक्रियेची माहिती देत उमेदवारी अर्ज माघारी घेण्यासाठी १५ मिनिटांचा अवधी जाहीर केला. यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) तसेच शिवसेना (शिंदे गट) सदस्यांमध्ये चर्चा झाली. या चर्चेनंतर विरोधी पक्षाचे विजयसिंह शिंदे आणि मंगेश काकडे यांनी आपले उमेदवारी अर्ज माघारी घेतले. त्यानंतर अध्यक्षपदासाठी वीरधवल जगदाळे आणि उपाध्यक्षपदासाठी विवेक वळसे पाटील यांची बिनविरोध निवड झाल्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी जाहीर केले.

## शिरुरमध्ये ऊसाच्या शेतात लहान मुलाची बॉडी; बिबट्याने मारलं की घातपात?

शिरूर । प्रतिनिधी

पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील दहिवडी गावातील मांजरे वस्ती येथे साई मांजरे या सहावीत शिकणाऱ्या मुलाचा संशयास्पद मृत्यू (झींपश उीळाश पशीु) झाल्याची धक्कादायक घटना समोर आली होती. सदर मृत्यू हा हत्या आहे की घातपात, याबाबत संभ्रम निर्माण झाला होता, या मृत्यू (झींपश उीळाश पशीु) झालेल्या मुलाच्या डोक्यावर खोल जखम आढळून आली होती. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मृत साई मांजरे हा तळेगाव ढमढेरे येथील शाळेत शिक्षण घेत होता. घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलिस अधिकारी प्रशांत घटनास्थळी पोहोचले होते. तसेच वनविभागाची टीमही घटनास्थळी दाखल झाली होती, या घटनेचा पोलिसांनी सर्व बाजुने तपास सुरू केला होता. तर या घटनेबाबत पुणे पोलिस अधिक्षक संदीप सिंह गिल यांनी माहिती दिली आहे.(झींपश उीळाश पशीु)

संदीप सिंह गिल यांनी माहिती देताना सांगितलं की, शिरूर तालुक्यातील दहिवडी येथील १२ वर्षाच्या मुलाचा मृतदेह उसाच्या शेतात आढळून आला आहे. त्याच्या शरीरावर जखमा होत्या, त्यानुसार आम्ही खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. दोन वर्षापूर्वी अशी घटना




घडल्याची माहिती मिळतं आहे. त्यावेळी बिबट्याच्या हल्ल्यात त्याचा मृत्यू झाल्याची शंका त्यावेळी व्यक्त केली. मात्र आता त्या घटनेबाबत देखील सखोल तपास होईल, या आत्ताच्या घटनेच फॉरेन्सिक लॅबच्या अहवालानंतर त्याची हत्या झाल्याची माहिती मिळाली आहे, याबाबत तपास सुरू आहे. यावेळी आम्ही खुनाचा गुन्हा दाखल केला आहे, तपासात काही गोष्टी समोर येतील, तपासात सर्व निष्पन्न होईल, असंही संदीप सिंह गिल यांनी सांगितलं आहे. या घटनेचा तपास सुरू आहे, त्या मुलाच्या शरीरावरती काही खुना आहे. दोन्ही घटनांचा तपास केला जाणार आहे, वस्तुस्थिती आहे त्याबाबत तपास सुरू आहे.(झींपश उीळाश पशीु) त्याचबरोबर वाढती गुन्हेगारी आणि अल्पवयीन मुलांचा गुन्हेगारीमध्ये असलेला समावेश याबाबत बोलताना गिल म्हणाले की, काही अल्पवयीन मुले आहेत .यांची जनजागृती करत आहोत. शाळेत हल्ल्याच्या घटना होत आहेत, पण शाळेत जाऊन पोलिसांना बॅग चेक करणे शक्य नाही, माहिती मिळाले तर ठीक आहे. पालकांनी आणि शिक्षणाची यांची लक्ष दिले पाहिजे. गुन्हेगाराच्या प्रवृती मागे अल्पवयीन मुले जात आहे, यासाठी पालकांनी लक्ष देणे गरजचे आहे. आम्ही शाळेत जाऊन आव्हान करतोय, मात्र पालकांनी शिक्षणाची यात मार्ग काढला पाहिजे. अल्पवयीन मुले गाडी चालवत असतील आणि गाड्यांना काळया काचा आतील तर त्यांच्यावर कारवाई होणे गरजचे आहे, असंही त्यांनी म्हटलं आहे.

## लोणावळ्यातील आलिशान व्हिलामध्ये चालत होता करोडोंचा सायबर घोटाळा; चीन कनेक्शनही आले समोर

लोणावळा । प्रतिनिधी


पुण्याच्या लोणावळ्यात चीन कनेक्शन असलेल्या सायबर फसवणूक प्रकरणाचा मोठा पर्दाफाश झाला आहे. ही टोळी हाँगकाँगमधील कंपनीत नोकरी लावून देण्याच्या आमिष दाखवत होती. लोणावळ्यातील एका व्हिलातून तरुणांची फसवणूक सुरू असल्याची माहिती पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांना मिळताच त्यांनी सापळा रचत चार आरोपींना अटक केली आहे.



अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे मोनिल अतुलकुमार मोदी (२४, मेहसाणा, गुजरात), रवी गोकुल प्रसाद जाट (२२, राजगड, मध्यप्रदेश), ऋषभपाल सिंग गजेंद्रसिंग चौहान (२२, खंडवा, मध्यप्रदेश) आणि हंश कैलास वर्मा (१९, बोरीवली, मुंबई) अशी आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी बनावट ऑफर लेटर आणि कागदपत्रांच्या माध्यमातून तरुणांना परदेशात नोकरीचे आमिष दाखवत होते. त्यानंतर 'णडऊढ' या क्रिप्टोकरन्सीद्वारे पैसे ट्रान्सफर करण्यास भाग पाडले जात होते. या प्रकरणात सुमारे ९७ लाख ७० हजार रुपयांची फसवणूक झाल्याची नोंद आहे. आजवर अनेकांना एक कोटी रुपयांहून अधिकचा गंडा घातल्याची कबुली आरोपींनी दिली आहे. तपासात ही रक्कम गुजरातमधील खात्यांमध्ये ट्रान्सफर झाल्याचे उघड झाले असून, त्यानंतर वेगवेगळ्या राज्यांमध्ये ती फिरवण्यात आली. दरम्यान, लोणावळ्यातील एका व्हिलावर छापा टाकून पोलिसांनी आरोपींना ताब्यात घेतले. कारवाईदरम्यान एक लॅपटॉप, सात मोबाईल, १४ डेबिट कार्ड, वेब कॅमेरे, बँक खाते किट आणि बनावट स्टॅम्प असा मोठा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या टोळीमागे आंतरराष्ट्रीय नेटवर्क असल्याचा संशय व्यक्त केला जात असून, आरोपी परदेशातून मिळणाऱ्या सूचनांनुसार काम करत होते, अशी माहिती समोर आली आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून, नागरिकांनी परदेशी नोकरीच्या आमिषाला बळी न पडता आवश्यक ती पडताळणी करूनच व्यवहार करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

## रस्ता नसल्याने उपचारांसाठी तब्बल चार तासांचा विलंब; पुणे जिल्ह्यात दोन वर्षीय बालकाचा मृत्यू

मंचर: आंबेगाव आणि जुन्नर तालुक्याच्या सीमेवरील दुर्गम खेतेपठार (ता. आंबेगाव) येथील दोनवर्षीय मुलाला रस्त्याअभावी जीव गमावावा लागला. रस्ता नसल्याने उपचारांसाठी तब्बल चार तासांचा विलंब झाला. यातून आदिवासी शेतकरी कुटुंबीयातील या बालकाचा हृदयद्रावक मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरातून आक्रोश व्यक्त केला जात आहे.




खेतेपठार येथील आदित्य विकास घनकुटे या चिमुकल्याने रविवारी (दि. १५) दोन वर्षे पूर्ण करून तिसऱ्या वर्षात पदार्पण केले होते. वाढदिवसाचा आनंद घरात दरवळत असतानाच नियतीने घाला घातला. सोमवारी (दि. १६) दुपारी आदित्यला त्याची आई सुनिता या वरणभात खाऊ घालत होत्या. त्यावेळी त्याला ठसका लागला आणि त्याची दातखिळी बसली. त्यामुळे आदित्यची आई, आजी शारदा घनकुटे आणि त्यांचे कुटुंबिय घाबरले. त्यांनी आदित्यला पाठीवर घेऊन पायी चालत उपचारासाठी घोडेगाव येथे निघण्याचा प्रयत्न केला, मात्र रस्ता नसल्याने त्यांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागला. ऐन उन्हाच्या भरात घामाच्या धारा निथळत तीन ते चार किलोमीटर डोंगर दऱ्याची आणि उताराच्या पायवाटेवरून रामवाडी येथे आले. तेथून दुचाकीवर त्यांचे नातेवाईक दत्तात्रय खमसे यांना घेऊन घोडेगाव ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय उपचारासाठी बाळाला आणले. त्यावेळी बाळाची आरोग्य परिस्थिती चिंताजनक बनली होती. त्यांना रस्त्याच्या दुरवस्थेमुळे रुग्णालयात पोहचण्यासाठी जवळपास चार तासाचा विलंब झाला होता. वेळेत दवाखान्यात पोहोचता न आल्याने त्या निरागस जीवाचा मृत्यू झाला. घोडेगाव ग्रामीण रुग्णालयातून बाळाला शवविच्छेदनासाठी मंचर उपजिल्हा रुग्णालयात आणण्यात आले. तेथे डॉ. साहिल टाके यांनी शवविच्छेदन केले. त्यावेळी प्राथमिक अंदाजानुसार बाळाच्या अन्ननलिकेतील अन्नाचे कण श्वासनलिकेत अडकून श्वास रोखला गेल्यामुळे त्याचा मृत्यू झाल्याचा निष्कर्ष निघाला आहे. मुलगा आदित्य याचे मृत्यू झाल्याने आई सुनिता यांना मानसिक धक्का बसला आहे. त्यांना घोडेगाव येथील खासगी दवाखान्यात दाखल करण्यात आले आहे. ही बाळाच्या मृत्यूची घटना केवळ एक दुर्दैवी प्रसंग नसून, रस्ता प्रशासनाच्या दुर्लक्षाचा जिवंत पुरावा ठरला आहे. आपटीमार्गे सुरू असलेले कामही वन विभागाच्या अडथळ्यामुळे अपूर्णच राहिले आहे. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत रुग्णांना वेळेत मदत मिळणे अशक्य बनले आहे. आता विकासाच्या दाव्यांमध्ये खेतेपठार नेमके कुठे आहे? असा आदित्यच्या मृत्यूने एकच प्रश्न सर्वांसमोर उभा केला आहे.

## पहलगाम हल्ल्यानंतर वर्षभराने न्याय; आसावरी जगदाळे यांची महापालिकेत वर्ग-२ पदावर नियुक्ती

पुणे: काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यात पुण्यातील संतोष जगदाळे यांचा मृत्यू झाल्यानंतर वर्षभर न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या त्यांच्या कुटुंबाला अखेर दिलासा मिळाला आहे. संतोष जगदाळे यांची कन्या आसावरी जगदाळे यांना पुणे महानगरपालिका येथे वर्ग-२ (प्रशासकीय अधिकारी) पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. महापौर मंजुषा नागपूरे यांच्या हस्ते, सभागृह नेते गणेश बिडकर आणि आयुक्त नवलकिशोर राम यांच्या उपस्थितीत आसावरी यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दूरध्वनीद्वारे त्यांचे अभिनंदन केले.



पहलगाम दुर्घटनेनंतर जगदाळे कुटुंबाच्या सांत्वनासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्या निवासस्थानी भेट दिली होती. त्या वेळी कुटुंबावर कोसळलेल्या दुःखाच्या पार्श्वभूमीवर आसावरी यांना शासकीय नोकरी देण्याचे आश्वासन त्यांनी दिले होते. प्रशासकीय प्रक्रियेमुळे काही विलंब झाला असला, तरी शिंदे यांनी महापालिका प्रशासनाशी थेट संवाद साधून प्रक्रिया गतिमान करण्याच्या सूचना दिल्या होत्या. आसावरी जगदाळे यांनी संगणक शास्त्रात पदवी तसेच मानव संसाधन व्यवस्थापनात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले आहे. त्यांच्या शैक्षणिक पात्रतेचा विचार करून त्यांना समकक्ष पद उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. सामान्यतः महापालिका स्तरावर वर्ग-३ किंवा वर्ग-४ पदे भरण्याचे अधिकार असतात; मात्र राज्य शासनाने 'विशेष बाब' म्हणून आसावरी यांच्यासाठी वर्ग-२ (प्रशासकीय अधिकारी) पदाला मंजुरी दिली आहे.

## पुण्यात अल्पवयीन मुलीवर अत्याचार; चार आरोपी अटकेत

पुणे: पंधरा वर्षांच्या अल्पवयीन गतिमंद मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार भारती विद्यापीठ पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडला, तर दोघांनी तिच्याशी अश्लील चाळे केल्याचा प्रकार समोर आला आहे. मागील तीन ते साडेतीन महिन्यांत हा प्रकार घडला असून, तिघांनी वेगवेगळ्या वेळी तसेच वेगवेगळया ठिकाणी अत्याचार केला आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.




आशुतोष विजयकुमार पाटील (वय २५), नागेश सूर्यवंशी (वय २१), गौरव माने (वय २०) यांना बलात्कार तसेच प्रीतम जगताप याला विनयभंगाच्या गुन्ह्यात अटक केली आहे. तर, एक आरोपी पसार झाला आहे. याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात पीडित मुलीच्या कुटुंबीयांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार, पोलिसांनी तीन तरुणांवर बलात्कार तसेच दोन तरुणांवर विनयभंगाचा गुन्हा नोंदविला आहे. आरोपी भारती विद्यापीठ पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहण्यात आहे, तर ही पीडित मुलगी अल्पवयीन असण्याबरोबर गतिमंद आहे. मागील तीन ते साडेतीन महिन्यांपासून आशुतोष, नागेश तसेच गौरव या तिघांनी तिच्यावर वेगवेगळ्या ठिकाणी आणि एकट्या-एकट्यांनी तिला गाठून अत्याचार केला. तर, प्रीतम या तरुणाने तिच्या अश्लील चाळे करून तिचा विनयभंग केला. तसेच पाचव्या आरोपीने तिच्याशी व्हिडीओ कॉल करून तिचा विनयभंग केला असल्याचे तपासात समोर आले आहे. दरम्यान, या प्रकरणात मंगळवारी गुन्हा नोंदविण्यात आला असून, त्यानंतर पोलिसांनी या प्रकरणात चौघांना अटक केली आहे.

तीन आरोपींनी वेगवेगळ्या ठिकाणी आणि वेगवेगळ्या वेळी बलात्कार केला आहे. सामूहिक अत्याचार झालेला नसला तरी हे आरोपी एकमेकांच्या ओळखीतील असल्याचे समजते. तर, तिघांनी या तरुणीला पकडून तिच्याशी अश्लील चाळे देखील केले. भारती विद्यापीठ पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राहुल खिलारे यांनी आरोपींना अटक केल्याची माहिती दिली.

## गुढी कधी उभारावी? जाणून घ्या पूजेचा शुभ मुहूर्त, पंचांगकर्ते दातेंची महत्त्वाची माहिती

पुणे : साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या गुढीपाडवा या हिंदू नववर्षाच्या सुरुवातीच्या दिनी गुरुवारी (दि. १९) सकाळी ६ वाजून ५४ मिनिटांनंतर गुढी उभारावी. सूर्यास्ताच्या सुमारास नमस्कार करून गुढी उतरवून ठेवावी, अशी माहिती पंचांगकर्ते मोहन दाते यांनी दिली. गुरुवारी गुढीपाडव्याचा सण उत्साहात साजरा केला जाणार असून, सणानिमित्त घरोघरी तयारीला सुरुवात झाली आहे.



नवीन शके १९४८ या संवत्सराचे नाव 'पराभव संवत्सर' असे आहे. गुढीपाडव्याच्या दिवशी आपल्या नवीन वर्षाची सुरुवात होते. या दिवशी सकाळी घरोघरी गुढी उभारून, तोरण लावून नवीन वर्षाचे स्वागत केले जाते.

आपली कालगणना हजारो वर्षे जुनी आहे. ती ग्रहांवर आधारित कालगणना पंचांगाच्या माध्यमातून आपल्याला कळते. म्हणून संवत्सर आरंभाच्या दिवशी गुढीबरोबर पंचांगावरील गणपतीचे पूजन करावयास सांगितले आहे. हा उत्सव घरोघरी करावयाचा असल्यामुळे आपण स्वतंत्रपणे राहत असल्यास आपल्या घरीही पूजा करून गुढी उभी करावी, गुढीपूजनाकरिता वेगळा असा विधी नाही. गुढी उभी करणे, हे मांगल्याचे प्रतीक आहे, असे दाते यांनी सांगितले.


दैनिक राज्य लोकतंत्र
च्या पाचव्या वर्धापन दिन
व गुढीपाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा..!
:::शुभेच्छुक:::
कर्मचारी वृंद
पाटबंधारे उपविभाग
खरवंडी कासार पाथर्डी


दैनिक राज्य लोकतंत्र
च्या पाचव्या वर्धापन दिन
व गुढीपाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा..!
मा. धोंडीरामजी राठोड
शुभेच्छुक : आमदार राजेश राठोड
सरचिटणीस : महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी, मुंबई


दैनिक राज्य लोकतंत्र
च्या पाचव्या वर्धापन दिन व
गुढीपाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा..!
प्राचार्य
डॉ.विश्वास कल्याणराव कदम
प्राचार्य
डॉ.लोखंडे सर
डॉ.नारायण फुने
:::शुभेच्छुक:::
जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला
व विज्ञान महाविद्यालय पाटोदा जि.बीड


दैनिक राज्य लोकतंत्र
च्या पाचव्या वर्धापन दिन
व गुढीपाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा..!
–:: शुभेच्छुक ::–
अरविंद कल्याण दुबाले
कनिष्ठ अभियंता श्रेणी २
ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग,बीड


दैनिक राज्य लोकतंत्र
च्या पाचव्या वर्धापन दिनास
हार्दिक शुभेच्छा..!
:::शुभेच्छुक:::
अमर नाईकवाडे
नगरसेवक ,नगरपालिका बीड


दैनिक राज्य लोकतंत्र
च्या पाचव्या वर्धापन दिन
व गुढीपाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा..!
:::शुभेच्छुक:::
श्री.पोपटराव खेडकर
गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर,पाथर्डी


दैनिक राज्य लोकतंत्र
च्या पाचव्या वर्धापन दिन
व गुढीपाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा..!
:::शुभेच्छुक:::
रोहिदास विश्वनाथ गिते
उपनगराध्यक्ष–नगरपंचायत पाटोदा


दैनिक राज्य लोकतंत्र
च्या पाचव्या वर्धापन दिन
व गुढीपाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा..!
:::शुभेच्छुक:::
श्री.मोरे.मुख्याध्यापक
प्रियदर्शनी प्राथमिक शाळा पाटोदा
ता.पाटोदा,जि.बीड.


दैनिक राज्य लोकतंत्र
च्या पाचव्या वर्धापन दिन
व गुढीपाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा..!
:::शुभेच्छुक:::
श्री.अमोल (भैया) गर्जे
नगरसेवक पाथर्डी नगरपरिषद
जिल्हा उपाध्यक्ष भाजपा,अहिल्यानगर


दैनिक राज्य लोकतंत्र
च्या पाचव्या वर्धापन दिन
व गुढीपाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा..!
:::शुभेच्छुक:::
नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव


दैनिक राज्य लोकतंत्र
च्या पाचव्या वर्धापन दिन
व गुढीपाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा..!
:::शुभेच्छुक:::
श्री.दादासाहेब मोरे पाटील
गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर, पाथर्डी


दैनिक राज्य लोकतंत्र
वर्धापन दिनाच्या
हार्दिक शुभेच्छा...
* शुभेच्छुक *
आ.विजयसिंह शिवाजीराव पंडित
(विधानसभा सदस्य,गेवराई)


दैनिक राज्य लोकतंत्र
च्या पाचव्या वर्धापन दिन
व गुढीपाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा..!
:::शुभेच्छुक:::
श्री.संजय फुंदे (सर)
अध्यक्ष
भगवान प्रतिष्ठान शिक्षण संस्था, पाथर्डी
न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज तनपुरवाडी पाथर्डी
रुक्मिणी बाई फुंदे कनिष्ठ महाविद्यालय चिंचपूर इजदे पाथर्डी


दैनिक राज्य लोकतंत्र
च्या पाचव्या वर्धापन दिन
व गुढीपाडव्याच्या
हार्दिक शुभेच्छा..!
:::शुभेच्छुक:::
श्री.मिथुन डोंगरे सर
अध्यक्ष
संत वामनभाऊ ग्रामीण शिक्षण संस्था
जवळवाडी पाथर्डी अहिल्यानगर
सरपंच टेंभुर्णी तालुका शिरूर कासार जिल्हा बीड
सचिव–जिल्हा मुख्याध्यापक संघ अहिल्यानगर